म. ग्रं. सं. ठाणें

विषय नाटक

लेखक ना. ह. भागवत

सन १८८२

संग्रहालय क्रमांक

पुस्तकाचें नांव राष्ट्रीय विचार प्रहसन

७८

नाटक

( वार्ताहरांत छापून प्रसिद्ध झालेलें )

# राष्ट्रीयविचारप्रहसन

नारायण हरि भागवत.

मुंबई.
फ्यामिली प्रिंटिंग प्रेस.

भाद्रपद शुक्ल १, शालि० शके १८११.
( इसवी सन १८८९. )

किंमत ४ आणे. टपाल हं. ६ पै.

(या प्रहसनाच्या संबंधानें सर्व प्रकारचे
हक्क प्रकाशकाचे आहेत. )

न. ९ सं.गो
DAILY PRINTING PRESS

# राष्ट्रीय विचार प्रहसन.

पात्रें– रस्त्यावर दोन गृहस्थ भेटतात.

१ला—अहो नमस्कार हो महाराज नमस्कार.

२ रा–कांहो बुवा, तुह्मी आह्माला " महाराज" ह्मणूनसा नमस्कार केलात ?

१ला —त्यांत कांहीं माझा दुसरा तिसरा हेतु नव्हता—पण आपलें नांव लवकर आठवेना ह्मणून महाराज ह्मटलें इतकेंच—

२रा:–बरें तर काय ह्मणतां महा-महाराज तिरसिंगराव नमस्कार–उलट बरें कां ?

१ला–असें ह्मणून आपल्या मनाची समजूत होत असेल तर होऊं द्या.

२रा–अहो समजूत कशाची त्यांत ? तुमचें आमचें देणें घेणें फारच आहे ? ! जशास तसें असलें ह्मणजे बरें.

१ला–हो आठवलें बुवा नांव–रावसाहेब ! नमस्कार–आतां तर झालें ना ?

२रा–असे शुद्धीवर येत चाललेत, ह्मणजे सगळें कांहीं नीट होईल !

१ला–अशीच का तर तुमच्याकडून आह्मांला मदत मिळायाची ?

२रा—आमच्याकडून खरें सांगतों—आपल्याला कांहीं इतकी देखील मदत व्हायची नाहीं.

१ला—अहो ऐकाल तरी, कशाला मदत पाहिजे ती ?

२रा—काय ऐकायचें आहे हो ? तुह्मी ह्मणजे आमचें कल्याण करण्याकरितां, ह्मणून आपलें स्वतःचें कल्याण करण्याकरितां मदत मागणार कीं नाहीं ? बस्स नको तें असलें आमचें कल्याण. हे आमचीं कल्याणें करणार, ह्मणजे यांच्याजवळ कायते विषय पांच ! पहिला विधवापुनर्विवाह, दुसरा बालविवाह, तिसरा विसमिल्ला, चौथा समाज आणि पांचवा सद्दा !

१ला—अहो राष्ट्रीयसभा यंदां आपल्या इलाख्यांत भरायची आहेना ?

२रा—भरेल पाहिजे तर ! तिला आह्मी भरूं नको कां ह्मणतो आहों ?

१ला—ती भरूं नये असें तुह्मी कधीं ह्मणणार नाहीं अशी तर आमची पक्की खातरीच आहे—पण ती भरविण्याच्या संबंधानें आपलीं पुष्कळ कर्तव्यकर्में आहेत, तीं सगळीं आपल्याला केलीं पाहिजेत ना ?

२रा—तीं करायला तुमचे हात का कुणि धरायला आलें आहे ?

१ला—अहो—तीं करायला आमचे हात जरी कुणि धरायला आलें नाहीं, तरी तीं कामें आमच्या एका दोघांच्या, किंवा दहा पांच जणांच्या

हातून होण्यासारखीं नाहींत. हें राष्ट्रीय हिताचें काम आहे–ह्मणून याला यथाशक्ति सर्वांचा हातभार लागला पाहिजे–सर्वांनीं एक जुटानें काम केलें पाहिजे–सर्वांजवळून थोडथोडा पैसा जमवून या महत्कार्याला लागणाऱ्या खर्चाची रक्कम उभारली पाहिजे–येणाऱ्या निरनिराळ्या जातीच्या पाहुण्यांची त्यांच्या त्यांच्या धर्माप्रमाणें त्यांच्या रहाण्याची, खाण्यापिण्याची वगैरे योग्य प्रकारची व्यवस्था ठेविली पाहिजे—अशी अनेक कामें आहेत.

२रा–वः–आपल्या सारखी मंडळी बोलायचें काम फार उत्तम प्रकारचें शिकली आहे! हूं चालूं द्या आपलें गुऱ्हाळ !

१ला—एकून आमच्या बोलण्यांत तुह्माला कांहीं अर्थ दिसत नाहीं तर ?

२रा—छे छे—आपल्या शद्वांत अर्थ नाहीं असें कसें मी ह्मणेन ? पण त्या शद्वांचा अर्थ तुह्माला लोकांना जसा सांगतां येतो, तसा तुह्माला मात्र कळत नाहीं !

१ला—हें मोठ्या धाडसाचें तुह्मी बोलतां ?

२रा—आमचें तूर्त रहालें तें बोलणें–तुमचें संपू द्या एकदां.

१ला–अहो 'राष्ट्रीय सभा' ह्मणजे काय हें तर आतां चार वर्षांच्या अनुभवानें तुह्माला पुर्तेपणीं कळलें आहेना ?

२रा–आह्माला कळल्या न कळल्याची गोष्ट

राहूं द्याहो—तुह्माला काय बोलायचें आहे तें बोला—

१ला—हेंच तें आह्मी ह्मणतों, कीं आमच्या लोकांच्या हिताकरितां इतके जिवापाड आह्मीं श्रम करीत असतांहि आह्मी नुस्ते काय सांगतों—तें देखील लोक समजून घेत नाहींत !

२रा—माफ करा महाराज. तुह्मी लोकांना समजून सांगण्यापूर्वीं तुमच्या कृती पाहून तुमचें काय आहे, ते लोक अगाऊच समजून जातात !— पुढें बोला.

१ला—एकून आमच्यावर लोकांचा विश्वास नाहीं असें का तुमचें ह्मणणें आहे ?

२रा—हें ज्याचें त्यानें काय आहे तें समजून घ्यावें.

१ला—असें कां पण ? आणि तें तुह्मी आह्माला काय ह्मणून सांगूं नयेंत ?

२रा—तें खरें आह्मी सांगावें तें—पण तुमचें तुह्मालाच तुमच्या कृतीवरून जें वेळींच कळत असतें, तें आह्मी सांगण्याची कांहीं जरूरी नाहीं. तशांतून तुह्मी पडलां चुकार मंडळी !

१ला—चुकार ! असें ह्मणणें पुन्हां दुसऱ्या मोठ्या साहसाचें आहे ! कारण प्रत्येक कामांत आह्मी असतोंच.

२रा—पण त्या कामाच्या केव्हां केव्हां आरंभीं, आणि नेहेमीं ह्मणजे बहुतकरून निकाल लागल्यावर !

१ला–फुरसतीच्या मानानें केव्हां केव्हां असें होत असेल–नाहींच असें केवळ आमच्यानें म्हणवत नाहीं.

२रा—आपलें शहाणपण संभाळण्याची, किंवा गमविण्याची त्या कामांत वेळ असणें–हेंच आपल्या फुरसतीचें प्रमाण, असें आतां सर्व लोकांना ठाऊक झालें आहे!

१ला–असें कशावरून?

२रा–कोणत्याहि विचाराच्या गोष्टीची वाटाघाट करून ठरविण्याचे वेळीं आपण त्या मंडळींत कधींच नसतां त्यावरून!

१ला–आमच्या मंडळीबद्दल लोकांत अशा प्रकारची समजून होत असेल, तर ती मोठ्या चुकीची आहे असें आह्मी समजतों.

२रा–हें चुकीचें प्रकर्ण राहूं द्या सद्ध्यां, त्याचा पुन्हां केव्हां तरी विचार करतां येईल—पण तें तुमचें राष्ट्रीय प्रकर्ण पुन्हां काढा पाहूं–

१ला–बरें तर राहूं द्या ह्यावेळीं–कारण त्या गोष्टी समजवून सांगण्याची आतांची वेळ नाहीं. केव्हां तरी एकाद्या व्याख्यानांत त्या आह्मी लोकांना कळवूंच–पण यंदां राष्ट्रीयसभा आपल्या इलाख्यांत भरायची आहेना?

२रा—तें एकदां सांगितलेंत!

१ला—त्या कामीं लोक आह्माला अजून पर्यंत कांहीं मदत करीत नाहींत!

२रा–शैलशिखर हवेनें आपली मंडळी

सद्ध्यां गारठली आहे, तिला आधीं चांगलासा सोनताव मिळायला पाहिजे—मग या संबंधानें लोकांनीं आपण होऊनच काय खटपटी चालिवल्या आहेत त्या तिच्या कानावर जातील.

१ ला—एकून लोकांच्या खटपटी चालू झाल्या आहेत तर? आणि त्या आमच्या सल्ल्यावांचून!

२ रा—अशानेंच तर घोडें पेंड खाऊं लागतें तें! आपण स्वत. वेळेवर करायचें नाहीं—दुसरा कोणि मदत करूं लागेल तर त्याजबद्दल समाधान मानायचें नाहीं! आणि पुन्हां आपला शहाणपणाचा गड्डा झरूं द्यायचा नाहीं! ह्या तीन गोष्टींचा मेळ बसावा तो कसा?

१ ला—अशा प्रकारानें लोक जर कामें करूं लागतील, तर आमच्या पुढारीपणाची किंमत ती काय?

२ रा—आतां तुमच्या पुढारीपणाची किंमत काय आहे, ती मी कांहीं सांगत नाहीं—पण त्या बायका काय बोलताहेत तें ऐका, ह्मणजे तुमच्या सहज लक्षांत येईल.

---

## प्रवेश दुसरा.

**स्थळः**—घरांतील दिवाणखाना.

**पात्रें:**—सरस्वतिबाई-गंगूबाई-आणि चिमणाबाई.

स—(हातांत बुक घेऊन) हें बाई रा-

ष्ट्रीय-सभेचं बुक ! यांत हें काय लिहिलं आहे—
" अशाप्रकारें हिंदुस्थानांतील लहानमोठ्या शहरांतून, गांवांतून आणि खेड्यापाड्यांतून ह्या राष्ट्रीयसभेला अंतःकरणपूर्वक कळकळीचें साह्य मिळेल, तर हिंदुस्थानांतल्या लोकमताचा अखेर न्यायशील व विचारी ह्मणविणारें **वि-लायतसरकार** किंवा **हिंदुस्थानसरकार** क-रणार नाहीं एवढेंच नाहीं, तर हिंदुस्थानच्या लोकमतास उभयतां सरकार मान देऊन योग्य मागण्या असतील त्यांचा विचार करतील अशी पुष्कळांशीं खातरी वाटते." खरंच बाई, सर्व लोक सारख्या कळकळीनं मागतील, तर तें मागणं सरकाराला नको का लोकांना द्यायला ? नि तें असं सर्व लोकांचं मागणं न देईल, तर तें 'माबाप' सरकार तें कसं होईल ? ! आमच्या अमेरिकेंतून आलेल्या एक बाई सांगत नव्हत्या का--तिकडल्या लोकांनीं सरकाराजवळ मागायची खोटी—कीं तें देण्याच्या विचाराला सुरवात ! मग तिकडल्या प्रजेला दुःख तें का-शाला असणार ? आमच्या घरांत एकदां सांगणं झालं, कीं 'तुह्माला किंवा लोकांना वाटत अ-सेल—आमच्या घरांत खोऱ्यानें पैसे येतात—पण या महिन्याची गांठ त्या महिन्याशीं घालता घालता जी त्रेधा उडते, ती आमची आह्मालाच ठाऊक ! आह्मी पाहिजे तर थंड पाण्यानं स्नान करीत जाऊं—पण लाकुड ज्यास्त जळता उपयोग

नाहीं ! आमच्या अंगांत रोगाचें प्राबल्य झालं तरी चालेल—परंतु भाजीपाल्याला मिठ घालणं तें शपत घेण्यापुरती सवड मात्र केलेली असावी, या पलिकडेस ज्यास्त असूं नये ! तुपाची गोष्ट पावशेर दुधावर अंनशुद्धी भागवून गड्यामाणसा-सुद्धां कालवण पुरवावं, नि त्यांतच पोरांनीं दुध प्यायला मागितल्यास त्यांचं समाधान करावं ! भाऊजींनीं कुठें लिहून पाठविलं, कीं आह्माला रानांवनांत हरहमेश रहावं, व वेळींअवेळीं फिरावं लागतं, तर आह्माला हत्यारं बाळगायची परवानगी विचारा—तेव्हां लागलंच सांगणं झालं, कीं आपल्याला हत्यारं उचलायचीं नाहींत, नि आपल्यांत कुणि बाळगलीं नाहींत, नि अर्थ-शास्त्र-दृष्ट्या तीं बाळगणं देशाच्या नुकसानीचं काम आहे ! अशा वाई विचाराची आमच्या इकडली शहाणी धुरीण मंडळी आहे—नि या करितांच जर " त्यांना मिशा आहेत ह्मणून पुरुष ह्मणावं " असं कुणि स्त्रिया ह्मणत असतील, तर त्यांचं ह्मणणं खोटं आहे असं कांहीं कुणि ह्मणणार नाहीं !

गं:—(कांहीं वेळ ऐकत मागें उभी राहिलेली पुढें येते.) काय तरी बाई ! एकादं मनुष्य एकाद्या विचारांत गुंग झालं, ह्मणजे त्याला आपल्याकडे कुणि मनुष्य दृष्टीपुढें येऊन उभं राहलं तरी दिखिल दिसत नाहीं ! मी तर इथें केव्हांची येऊन यांच्या शेजारी उभी राहिलें

आहे—आत्तां या मजकडे पहातील, अंमळशानें पहातील, असं करतां करतां एक घटका झाली! तरी बाई आपल्या—आपल्यांच नादांत!

सः—गंगूबाई, अग नादांत कशाची! मी किनई आज नेमच केला होता—कीं आज तूं माझ्याजवळ आधीं बोलल्यावांचून तुजवळ मी ह्मणून बोलायची नाहीं.

गं:—बरं तर हा आतां आपला जसा कांहीं नवसच फेडून घेणं झालंना? कां अजून आणखी आपल्याला आपल्या नादांत पुन्हां शिरायचं आहे? नि मग मला दुसऱ्यानं आपल्यापुढं नाकदुऱ्या काढून आधीं बोलायला पाहिजे!

सः—वेडीच आहेस—अग तें मी किनई थट्टेनं बोल्ले!

गं:—मी तरी कुठें खरं ह्मणून बोल्ले!

सः—बरं आज कां आली होतीस? एरवींच ना?

गं:—एरवींच तर काय! मनाला एकदां वाटलं कीं तुमच्याकडे यावं, ह्मणजे इथें घटकाभर तरी आल्या वांचून कांहीं चैनच पडत नाहीं!!—असाच तुह्मी आपला लळा जसा कांहीं मला लावून ठेवला आहे!

सः—मला दिखिल किनई तुझी आठवण झाल्या वांचून एक घटका दिखील सुनी जात नाहीं.

गं:—बरं आज तूं कोणत्या विचारांत इतकी गर्क झाली होतीस?

सः——हें पाहिलंस का बुक—यांत हो !

गं:—(आश्चर्य करून) यांत बाई इतकं गढून जाण्यासारखं तें काय आहे ?

सः——तूं वाचलंस का तरी हें ?

गं:——मी नाहीं बाई तें वाचलं—असलंच एक बुक गतवर्षी आमच्या इथं आणलं होतं. तें ह्मणें मुंबईच्या वक्तृत्व-सभेनं छापलं होतं.

सः—हें कुणि अ. ज. देशपांड्यानं छापलं आहे ! त्यातलं किनई हें वाचून ( पूर्वोक्त अशा प्रकारें येथून वाचून दाखविते. ) माझ्या मनांत तूं जें ऐकलेंस तेच तरंग घोळत होते—आतां किनई आणखी थोडंच उरलं आहे, तें वाच बरं तूं.

गं:——(वाचते) "यंदाची" इथून का ?

सः——होय. तिथूनच तेवढा एक परिच्छेद वाच.

गं:—"यंदाची पांचवी राष्ट्रीयसभा मुंबईस भरावयाचें ठरलें आहे, तेव्हां यासंबंधानें सर्व व्यवस्था तेथली मंडळी करीलच अशा भरंवशा- वर राहून उपयोग नाहीं. हें काम एकट्या मुंबईचेंच नाहीं. यांत इसापनीतींतील 'पोट आणि अवयव' या गोष्टीप्रमाणें सर्वांचें हित असून एकाप्रकारें नांव होण्याची दुर्मिळ संधि आली आहे, ती आपण दवडतां कामा नये. चळवळीच्या कामांत व टापटिपीविषयीं नांवा- जलेल्या आमच्या पुण्यपत्तनस्थ बंधूंनीं अशावेळीं कंबर बांधली पाहिजे."

सः—ऐकलंसना हें यांत काय लिहिलं आहे तें ? मला वाटतं आतां पुण्याच्या कंबर बांधलेल्या मंडळीला कंबरा सोडायची वेळ आली असेल !

गंः—पुण्याची मंडळी तर राष्ट्रीय सभाच पुण्यांत भरवा ह्मणून ह्मणत होती.

सः—ह्मणूनच तर मी ह्मणतें, कीं ह्या मंडळीला आतां कंबरा सोडायची वेळ आली आहे !

गंः—ती कशी ?

सः—आपल्या मुंबईच्या मंडळीनं राष्ट्रीय-सभा इथेंच भरायची असा आग्रह धरून पुण्याच्या मंडळीला चुरमुरे पदरांत देऊन परत लावली त्याचं कांहीं अद्याप केलं कां चिज ?

चिः—( एकादम येऊन ) अहो बायांनो—ऐकलीत कां पण एक मौज ?

दोघी एकदमः—नाहीं हो बाईसाहेब—काय ती सांगा ह्मणजे आह्मी ऐकूं—

चिः—कालरात्रीं किनई, मी आपलं सहज हासत हासतच विचारलं, कीं राष्ट्रीय सभेची कुठें धामधूम दिसायला लागली नाहीं. त्याच्यावर कांहीं वेळ अमळसं बोलायचंच होईना, ह्मणून फिरून जेव्हां मी तेंच विचारलं, तेव्हां आंतल्या रागानंच सांगायचं झालं, कीं कुठून आह्मी हा मूर्खपणा केला नि या ढंगांत शिरलों.

सः—यवढंच कां बोलणं झालं ?

चि:—तें रागांतलं बोलणं झालं असं मला कळतं, तर मी आपली मुकाट्यांनंच बसलें असतें.

गं:—बरं मग आपले यजमान आणखी काय बोल्ले तें तर आतां आह्मांला ऐकूं दे.

चि:—ह्मणून मी तेंच पुन्हां विचारलं, तेव्हां ह्मणायचं झालं, कीं ज्याचं त्याला आतां पोझिशन संभाळलं पाहिजे—लोकांना काय—आमचं नुकसान होऊं लागलं, तर ते कांहीं आपल्या घरून थैली आणून भरून देणार नाहींत.

स:—या सभेपासून आपल्या यजमानांचं काय नुक्सान आहे ह्मणून ते ह्मणत होते? ह्मटलं तर ते स्वतंत्र धंदा करणारे आहेत.

चि:—काय आहे तें मला तरी बाई काय ठाऊक— पण मी जेव्हां असं ह्मटलं, कीं हें जर पहिल्यानं आपल्याला कळत होतं, तर आधीं पासूनच सावध रहालं असत, तर बरं नसत कां झालं—इतकं बोल्ले मात्र मी, तों एकेक डोळा हा असलाला मजवर वटारला—तेव्हां किनई मी बाई भिऊन तिथून उठून चालती झालें.

स:—ऐकलेंत ना हे पुरुषार्थ आमच्या पुरुष मंडळीचे! जनसुख काय आहे ह्मणून जर आह्मी त्यांना सांगायला गेलो, तर ह्मणतात—बस्स बस्स तुमची अक्कल, पुरें करा. विद्येचा संसर्ग नसता, आह्मला शहाणपण शिकवायला येणाऱ्या केवढ्या पहा! आतां असं नाहीं का होत—त्यांच्याच ह्मणण्या प्रमाणें कां होईना— आह्मा अवि-

द्वान स्त्रियांना या विद्वान पुरुषापेक्षां अधिक ज्यास्त कळतं !

चि:—पण हे असं कळून आपल्याला कांहीं उपयोग आहे का ?

गं:—उपयोग करून घेण्याची बाजू जर त्यांच्या स्वाधीन आहे, तर आपल्याला कळल्या पासून आपण त्यांना प्रसंग येईल तेव्हां तेव्हां लाजवीत जावं—येवढंच आपल्या हातांत आहे.

स:—त्यांच्या मताप्रमाणें आपण न शिकलेल्या बायका तर वेड्याच ठरलों आहोंत, कारण फजिती नि जनसौख्य याचा जसा आपल्याला समज झाला आहे, तसा त्यांना नाहीं. बरं पण आपण इथें या गोष्टी बोलत बसतांना कां स्वारी ऐकेल, तर ह्मणायचं होईल, कीं 'व: ! चांगले विचार चालले आहेत ! करा आतां लवकर अमेरिकेला जाण्याची तयारी! आह्मी जी कांहीं कोणाची स्तुति करीत असतों, त्यांत आह्माला कांहीं गुप्त स्वार्थ साधायचा असतो—ह्मणून आमच्या बायकांनी तसं वर्तन करावं अशी आमची इच्छा नसते. ' चला बाई स्वारी इंदुप्रकाशच हातांत घेऊन येते आहे—नि आणखी कुणि मंडळी यायची असेल—तर आपणच इथून आतां जाऊं कशा. (जातात.)

---

प्रवेश ३ रा.

**स्थळः**—दिवाणखाना.

**पात्रेंः**--फिरकीराव, सरस्वतिबाई (त्याचें कुटूंब) आणि बगलबच्चूराय.

फिः—( इं. प्र. हातांत घेऊन आपल्याशीं ) ही आपली आपली मंडळी ह्मणून ह्मणावी—पण कुच कामाची ! कारण प्रसंगीं आमचीच फजी-ती करण्याला ही कारण होते ! यांनीं सुधाऱ्या-ची दीक्षा मात्र धारण केली आहे—परंतु ‘ सुधा-रलों ’ ह्मणून ह्मणवून घ्यावें कसें, याची तर यांना बिलकूल कल्पनाच नाहीं ! आजकाल “ खऱ्या सुधारणेला ” किंमत नाहीं—पण ‘ सुधारला ’ या शद्बाला किंमत आहे ! हें गूढतत्व ज्यांना कळत नाहीं, किंवा जे लोक हें गूढतत्व आम-च्या कृतीवरून समजून घेण्याचा विचार करीत नाहींत, त्यांचा या कालांत भाग्योदय कधींच व्हायाचा नाहीं ! आमच्या इतक्या शिकलेले, व आमच्यासारखे बुद्धिवान—आज लोक थोडे का आहेत—पण त्या सर्वांत आमचीच चहा कां ? आपली लोकांत चहा तर असावी, सचो-टींत तर अंतर दिसूं नये, आणि द्रव्यलाभ तर सपाटून व्हावा—ह्या तिन्ही गोष्टी साधण्याक-रितां आह्मी आपल्या वर्तनक्रमाकरितां एक प्र-कारचें महातत्व शोधून काढलें—आणि त्याच तत्वाचें नांव “ गूढतत्व !” आतां या गूढत-त्वाच्या दृष्टीनें पाहूं गेलें असतां—या सुधारक

एडिटर मंडळीनें, त्यांना कांहीं अक्कल असेल, तर त्यांनीं आमची नुस्ती झील ओढावी—आणि असेंच केलें असतां त्यांचें कांहीं शहाणपण कायम राहील—नाहीं तर त्यांनाहि " सकट घोडे बारा टक्यांत " जावें लागेल ! आह्मी काय मूर्ख आहों-त ते आह्माला कळत नाहीं ह्मणून हा इंदुप्र-काश आह्माला लागावें अशा अर्थानें मोठ्या डौलानें जाड्या अक्षराच्या हेडिंगांत " आमचे इंडियन ग्ल्याडस्टोन " असें लिहून इंग्लिश ग्ल्याडस्टोनानें इंग्लंडच्या पश्चिमेस जशी प्राव्हिंशि-अल टूर केली——तशी आमच्या इकडील ग्ल्या-डस्टोनांनीं करावी ह्मणून उपदेश करतो आहे ! अरे बाबा—इंग्लंड तें इंग्लंड आणि इंडिया तो इंडिया ! कसें झालें तरी इंग्लंड आज स्वतंत्र आहे, आणि इंडिआ परतंत्र आहे. आणि अशा स्वतंत्र देशांत ग्ल्याडस्टोन ह्मणून जो आहे तो एकच आहे ! परंतु आमच्या इकडे इंडियन ग्ल्याडस्टोन कोण ह्मणून ठरवायची का वेळ आली——तर आमच्या या नुस्त्या महाराष्ट्रीयांतच रण पडायची वेळ येईल ! हेच दीड शहाणे पहाना——आह्मी ज्या कांहीं गोष्टी करूं त्यांचा निमूटपणें स्तुतिपाठ गायचा सोडून आह्माला उपदेश करण्याचें स्थान पतकरतात ! परंतु अशीं कामें हातीं धरण्याला स्वातंत्र्य ह्मणून जो उभय देशांत भेद आहे, तोच आह्माला हीं अस-लीं कामें करूं देत नाहीं—हें त्यांच्या लक्षांत

वागतच नाहीं ! ग्ल्याडस्टोनसारखे स्वदेश कल्याणार्थ, लोकहितार्थ, राजनिष्ठापूर्वक—राष्ट्रीयसभेचे हेतू आहेत, आणि ते लोकांना सांगून लोकमत जागृत करणें, हें खऱ्या खऱ्या देशहितार्चे आणि लोककल्याणाचें काम असून, तें आपल्या राष्ट्राचे हितार्थ केलें असतां न्यायदेवतेचा आपल्यावर कोणत्याहि प्रकारें रुसवा होण्यासारखें नाहीं, अशी आमच्या मनोदेवतेची खात्री असतां—आह्मी इंग्लिश ग्ल्याडस्टोनसारखें का करीत नाहीं, याचा विचार ह्यांच्या मनानें करूंच कां नये ? ही मोठ्या शरमेचीच गोष्ट समजली पाहिजे ! आज आह्मी इंग्लिश ग्ल्याडस्टोनसारखें करूं तर आजच आमचें शहाणपणाच्या पटांत पडलेलें नांव निघण्याची वेळ येईल. आणि कोणत्याहि प्रकारचे श्रम न करतां “ नाहींस ” नकार आणि “ होयास ” सकार करून आह्मी लोकांचे धुरीण आहोंत असें सहजी ठरतें आहे, आणि त्यायोगें आमच्या मानांत व लाभांत उत्तरोत्तर वढती होते आहे--- तर शहाणपणाच्या पटांतून निघून, आपलें नुकसान करून, स्वतःच्या पैशाला खार लावून, या गांवाहून त्या गांवीं, आणि त्या गांवाहून पलिकडल्या गांवीं—फिरण्याचे श्रम करायला कुणि सांगितलें आहे ? आणि समजा आह्मी असेंहि फिरलों, आणि ह्यांच्या ह्मणण्याप्रमाणें सगळ्या गोष्टीहि केल्या—तथापि आमची खात्री

आहे, कीं आह्मी मागून ह्मणून आह्माला कांहीं एक मिळायचें नाहीं—मग ही रिकामटेकडी दगदग हवी कशाला ? " तुह्मी मागत असा, " " तुमच्या योग्य मागण्यांचा आज नाहीं तर उद्यां तरी सरकार योग्य विचार करी-ल "—असें चार हजार कोसांच्या अंतरावरून दुरून सांगण्यास इंग्लिश लोकांना ठिक आहे, आणि आह्मालाहि पण ऐकायला गोड आहे !–( इतक्यांत सरस्वतीबाई दुधाचा पेला घेऊन येते तिला पाहून. ) आमच्या पोटांत भुकेची कळ निघायला, आणि आपण दृष्टी पडायला एकच गांठ झाली !

सः—(पदरा आड पेला करून) पण हें कांहीं मी कोणाला द्यायला आणलं नाहीं!

फिः—वारंवार आपल्या सहवासाचें आह्मा-ला जें समाधान वाटतें–तें याच आपल्या अशा विनोदी स्वभावाचें ! मला वाटतें, एकंदर सुधार-लेल्या राष्ट्रांतील विद्वान बायकांजवळ आपल्या सारखी विनयवृत्ती दृष्टीस पडणें कठीण ! खरोख रीच मी सांगतों—कीं आमच्या राष्ट्रांतील अशा वि-नयचतुर बायका एक प्रकारचें आह्माला डौल मिरविण्याचें भूषणच आहे असें आह्मी समजतों !

सः—कांहीं पुरुषांना आमची बायकांची स्तुति करायलाहि वेळ लागत नाहीं, नि घट-केभरानं दुसऱ्या ठिकाणीं जाऊन त्यांची निंदाहि करायला वेळ लागत नाहीं !

फि:—असें कांहीं मूर्ख लोक कोणी असतील!

स:—कोणीहि असोत—बायकांना त्यांच्यांशी काय करायचं आहे? मी आपलं उगीच ह्मटलं.

फि:—कांहीं अशिक्षीत स्त्रिया मूर्ख तर खऱ्याच—पण मला मोठा आनंद वाटतो, कीं त्यांतहि कांहीं—

स:—भुक लागायची झालं आहे ना?

फि:—आपण दृष्टी पडल्या पासून आह्मी भुकच विसरत चाललों आहोत!

स:—हें (दूध पुढें करून) घ्यायचं होतं आधीं. मग वर्तमानपत्र वाचायला पुष्कळ वेळ आहे.

फि:—आपला शद्ब मोडायचा ह्मणजे कीं नाहीं—आमच्या मोठी जिवावर गोष्ट येते! (हात पुढें करून) द्या तर.

स:—पण माझं अशिक्षित बायकोच्या हातचं दूध आहे—

फि:—आह्मी खरेंच सांगतों, कीं हें भलत्याच ओघावर चाललेलें स्त्रियांचें शिक्षण पुरें आतां. आजपर्यंत आह्मी ज्या ज्या सुधारणा करीत गेलों, त्या त्या करते वेळीं आह्मी विचार ह्मणून कांहींच केलें नाहींत असें लोकांना वाटतें त्यांत कांहीं नवल नाहीं—परंतु तसें आतां आमचें आह्मालाच वाटूं लागलें आहे!

स:—नवलच नाहीं का बाई हें? असं कधीं आपल्याला वाटायचं नाहीं!

फि:—असें कधीं आह्माला वाटलें नसतें—

पण परवांच्या विलायतेहून आलेल्या डाकेवरून 'स्त्रियांच्या हक्का विरूद्ध प्रचंड वादळ' विलायतेस उद्भवल्याचें समजतें !

सः—हें तरी बाई नवलच नाहीं का ? तिथें दिखील मेले इथल्या सारखेच दुष्ट लोक आहेतच ना ?

फिः—हें वादळ पुरुष मंडळी कडून सुरूं झालें असतें, तर त्याजविषयीं आह्मी विचारच केला नसता—आणि आमचा मूर्खपणा आमच्या दृष्टीसाहि पडता ना.

सः—तर मग ?

फिः— हें वायका बायकांतच तुफान झालें आहे !

सः—त्या ह्मणतात तरी काय ?

फिः—कांहीं स्त्रिया राजप्रकर्णीं कामकाज करण्याचे हक्क मागूं लागल्या आहेत.

सः—खरंच का ?

फिः—आणि दुसऱ्या कांहीं स्त्रियाच आपल्या बहिणींच्या मागण्याला आडव्या येताहेत !

सः—त्यांचं ह्मणणं तरीं काय आहे ? कदाचित् त्या अशिक्षित असतील !

फिः—छे छे छे—त्या अशिक्षित नसून मोठ्या विद्वान आणि कुलीन घराण्यांतल्या आहेत ! त्या असें ह्मणतात, कीं " आपल्यास हक्क मिळावे ह्मणून स्त्रियांच्या ज्या खटपटी चालूं आहेत, त्यांमुळें मोठे भयंकर परिणाम होऊं पहात

आहेत. ते कोणते ह्मणाल तर पहा. दुराचरणी स्त्रियांचा मोठा समुदाय आहे, व अशा स्त्रियांस बहुतकरून हे हक्क मिळतील. असें झालें ह्मणजे एक तर विवाहित स्त्रियांस आपलें अंग काढून घ्यावें लागेल, अगर प्रपंचांत मोठ्या महत्वाचे फेरफार होऊं लागतील असें समजून त्यांस तें काम सोडून द्यावें लागेल."

सः—असंच आहे—ह्मणतात नाहीं, सोनारानं कान टोचावा लागतो! भलतंच शिकून चौचाल झालेल्या बायकांच्या दुराचरणाविषयीं साक्ष पटवायला अशाच साध्वी बायका पुढें सरसावल्या पाहिजेत. नाहीं तर कोण मेली आतांशा आमच्या इकडे ही घाण माजत चालली आहे! नाहीं आचार, नाहीं विचार—आहे ह्मणायला कांहीं नाहीं—इनक्या पंथाला ज्या आमच्या बायका पोचतात, त्यांच्या बद्दल पहावं तर मेलें सुधाऱ्या वर्तमानपत्रांतून त्यांचे पोवाड्यांवर पोवाडे येत असतात!

फिः—ह्यावरून आमचे विचार बदलत चालले खरे!

सः—देव करो नि सगळे वेडेवेडे विचार बदलोत—ह्मणजे मला तरी कोणाच्या भेटीला जाण्याच्या वेळीं बरोबर यावं लागायचं नाहीं!

फिः—ते बदलतील अशी आह्माला आतां आशा आहे.

सः—पण विचारलं तर सांगायचं होईल का!

नाहीं तर नको बाई–

फि:—वेळाशक विचारा.

स:–असं ह्मणायचं होतं–पण विचारलं तर ह्मणायचं होईल, कीं असली अशिक्षित बायको !

फि--आज कांहीं आपण विचारलेंत तरी सांगायचेंच.

स:—खचित ना पण हें ?

फि:–खचित ह्मणजे काय–सांगायचेंच ह्मटलें ह्मणजे सांगायचें.

स: —तें मग कायसं ठरायचं होतं–(इतक्यांत बगलबच्चू येतो त्याला पाहून) आज कांहीं सगळीच चांगली वेळ लागली नाहीं !

फि:–(बगलबच्चूला पाहून) ओ बगलबच्चूराय, आपल्या येण्याला कांहीं हरकत नाहीं–आणि आह्मी आपलीच वाट पहात बसलों आहोत.

स: —मी जातें आतां.

फि:—आपण बसलांत तर कांहीं हरकत नाहीं—पण आपली खुपीच बसायची नसेल तर जावें आपण. कारण आपल्याला आमच्यानें हरकत करवत नाहीं. पण जातांना हें आह्माला दुध दिलेलें भांडें घेऊन जाल—

स:—प्यायचं होतं तें दूध

फि:—ओ—आह्माला वाटलें, कीं त्यांतलें दुध आह्मी पिऊन गेलो आहोत ! ( दूध पितो. ) बगलबच्चूराय–आतां तुमच्याजवळ आह्माला बोलायची शक्ती येईल खरी !

व—आपण मेहेनतच फार करतां, आणि त्यामुळें असे थकतां—विश्रांति ह्मणून कधीं आपल्याला ठाऊकच नाहीं !

फि:—विश्रांति आह्मी घेऊं लागलों—कीं आह्मी आजारी पडलोंच ह्मणून समजा !

व:—खरेंच ! एरवींचें तर रहालेंच—पण सुटीच्या दिवशीं चार घटका जेवणखाण झाल्यावर वामकुक्षी करतांना मी कांहीं कधीं आपल्याला पहालें नाहीं !

फि:—आह्माला खरें पुसाल, तर कांहीं उद्योग करण्यांतच चैन वाटते.

व:—आपल्या चैनींत आणि लोकांच्या चैनींत फार अंतर आहे!—लोकांना भलतें भलतेंच करणें ह्मणजे चैन वाटते ! साठ वर्षे झालीं आणि आपल्या सारख्यांनीं त्यांच्या तोंडांत साखर घातली—तरी अंगवस्त्र ह्मणून कांहीं फेकून द्यायचें नाहीं !

फि:—आमच्यांतील नीति बिघडली ह्मणून आह्मी ह्मणतों तीं याच करितां ! या लोकांना शरम कशी असूं नये !

व:—बेशरमीच लोक ते ! आणि पुन्हां लोकांची निंदा करायला त्यांना लाज नाहीं वाटत !

फि:—या रिकामटेकड्या आणि पैसा बाळगून असलेल्या लोकांना राष्ट्रीयसभेसंबंधीं कांहीं खटपट करा ह्मणून सांगितलें, तर लागलेंच त्यां-

चें डोकें फिरून जातें !

ब:—हो हो लागलेंच त्यांचें डोकें फिरायचें ! कारण लोककल्याणाच्या कामीं त्यांच्या पैशाचा खर्च व्हायचा नाहीं !

फि:—आणि आमच्या नांवानें मात्र खडे फोडायला हे तयार !

ब:—तें कांहीं विचारूं नका ! आपल्या पुढें त्यांचें कांहीं चालत नाहीं ह्मणून ठिक आहे. नाहीं तर आपल्या विषयीं त्यांच्या मनांत फारच मत्सर आहे !—

फि:—यंदां आपण तर आपल्यावरची या राष्ट्रीयसभेची घोरपड काढून टाकतों.

ब:—राष्ट्रीयसभेकडे पहायला आपल्याला वेळ कुठें आहे ह्मणा !

फि:—वेळाचें काय आहे !—आपण वेळ हवी तशी करूं.

ब:—तेंहि खरेंच—आपल्याला वेळेचा काय तोटा आहे !

फि:—पण मी ह्मणतों, कीं अजून तरी या लोकांनीं समजून उमजून राष्ट्रीयसभेच्या कामाला लागावें. आमच्यावर त्यांनीं बिलकुल भिस्त ठेवूं नये.

ब:—काम करायला मात्र आपण—आणि चेष्टा करायला ते ! त्यापेक्षां राष्ट्रीयसभेचा नादच आपण सोडून द्यावा तें चांगलें.

फि:—आह्मीं तर तोच बेत केला आहे—

आणि तो कोणाला भिऊन केला आहे असें मात्र नाहीं—पण या लोकांच्या अशा कृती करितां आह्माला असें करणेंच भाग आहे.

ब:—या लोकांना राष्ट्रीयसभेच्या खर्चाकरितां द्यायला पैसे नाहींत, आणि कामाला वेळ नाहीं—आणि पार्ट्यांवर पार्ट्या झोडायला वेळ आहे आणि पैसे आहेत! साहेब, आपलेंच करणें रास्त आहे.

फि:—या याचकरितां! आज रात्रीं आपखीं पार्टी आहेच!

ब:—असायचीच! येऊन जाऊन त्यांना काय ती पार्टी दिसते! आपण जायचे असाल?

फि:—नान्सेन्स! त्यांच्यांत जावें यावें लागतें ह्मणून कदाचीत गेलो तर आह्मी जाऊं—परंतु तुह्मी शोध तर काढून आणा उद्यां. चला (जातात.)

---

## प्रवेश ४था.

**स्थळ:**—मदन बागेंतील रम्य बंगला

**पात्रें:**—सेक्रेटरी, रावसाहेब, तात्याभट, मल्हारराव, भाऊसाहेब, फिरकीराव वगैरे—साजिंद्यासह नायकीण— आणि टिप्या गवई.

(रावसाहेब आणि सेक्रेटरी बंगल्याभोंवतीं फिरताहेत.)

रा:—अशा प्लेझर पार्टींच्या कामाला से-

कोटरी असावा, तर आपल्याच सारखा पाहिजे! एकून ही जागा पाहूनच आपण आधीं खुष झालों!

से:—थोडेसे आंत तर सरका, ह्मणजे तो थाट पाहूनच आपल्या अंगाला गुदगुदल्या न होतील तर कशाला बोलूं! हा उगीच नुस्ता बाहेरचा देखावा आहे!

रा:—काय ह्मणतां! आंत शिरल्याबरोबर गुदगुदल्यो व्हायला लागायच्या आं?

से:—झाल्याच पाहिजेत! यांत काय संशय आहे? असाच थाट आंत उठवून दिला आहे!

रा:—मग त्या तुमच्या शिखंडी आणि शुक्राचार्य मंडळीची काय अवस्था होईल? हें पाहून तर त्यांच्या अंगाला कापरें भरायचें!

से:—अं:! कापरें भरायला काय झालें आहे त्यांना! त्यांना हें कांहीं नकोच आहे असें नाहीं—परंतु

रा:—आमच्या घरांत कुठें सातव्या मजल्या-वर आमचें एक राखलेलें मानुष आहे, त्याची लाज तुमच्या या शिखंडी मंडळीला वाटूं ला-गली!

से:—त्यांना त्याची लाज वाटली!—पण आपण कांहीं त्यांची पूजा करायची कमी केली नाहींत! नुस्ती त्यांची पुजा करून तरी थांबायचें होतेत—पण एकदम त्या मंडळीला फाटा देऊन पोरांच्या "गडी फू" सारखेंच करून टाकलेंत!

राः—आह्माला त्या मंडळीपाशीं काय कर्तव्य आहे ?

सेः—मी विचारतोंच तर—आपण आजपर्यंत त्या मंडळीपाशीं काय केलेंत ?

राः—आजपर्यंतची गोष्ट कांहीं निराळी होती.

सेः—आणि आतांचीच बदलायला काय झालें ? पण थोडेसें मी त्या मंडळीच्या तर्फेचेंच बोलतों ह्मणाना—

राः—( मध्येंच ) एकाददुसरा मनुष्य ह्मणजे मी मंडळी समजत नाहीं.

सेः—मला तरी तसेंच आपलें मत पाहिजे होतें ! कारण एकदोघेजण, किंवा समजा तीन चार अथवा दहापांचजण ह्मणजे—'मंडळी' या शब्दानें जनसमूह असा जो अर्थ घ्यायचा, तसा नाहीं, पण फक्त त्या त्या व्यक्ति विशेषच !

राः—बस्स तर काय—ह्मणूनच त्यांची आह्मी परवा करीत नाहीं !

सेः—मग ठीक आहे. आतां अशाच अर्थानें थोडासा मी त्यांच्या तर्फेनें बोलतों, ह्मणून माफी असावी.

राः—बोला बोला—त्यांच्या तर्फेनें तुमचे तरी विचार आह्माला कळूं द्या !

सेः—त्यांचें ह्मणणें असें, कीं आपल्याजवळ जो पैसा आहे त्याचा कांहीं तरी सद्व्यय व्हावा.

राः—आमच्या पैशाचा सद्व्यय व्हावा—फार

चांगली त्यांची इच्छा आहे, पण त्यांच्या पैशाचा काय व्यय व्हावा ?

से:—त्यांच्या पैशाची गोष्ट कशाला हवी ? ते आपला पैसा पुरून ठेवतील समजा.

रा:—त्याच न्यायानें तर—आमच्या पैशाची गोष्ट त्यांना हवी कशाला ? हा आह्मी आपला पैसा असा उधळून टाकूं—काय कोणाचें ह्मणणें आहे ?

से:—मग कांहीं बुवा आतां आपलें बोलणें नाहीं.

रा:—ह्मणून राष्ट्रीय-धर्म-तत्वाची **रामदासानें** मेख मारली आहे—कीं 'क्रियेवीण वाचाळता शून्य आहे'—लोकांचीं अंगवस्त्रें यांच्या डोळ्यांत सलतात—आणि सव्वा हात काठाच्या शालजोड्या यांच्या डोळ्यांत मावतात !

से:—जाऊं द्या कीं हो आपल्या मजेच्या गोष्टी बोलायच्या सोडून ह्या असल्या हव्यात कशाला ? आपल्याजवळ खुशाल अंगवस्त्रें असूं द्या, आणि त्यांच्याजवळ सव्वा हात काठाच्या, मी ह्मणतों आणखीं जरीच्या काठाच्या शालजोड्या असूं द्या—पण राष्ट्रीय कामाची जेव्हां जेव्हां वेळ येत जाईल, त्या त्या वेळेला एक असत जा ह्मणजे पुरे. अशा वेळीं मात्र कोणाचा ३६चा आकडा नसावा.

रा:—बरें—आज रात्रीचा कसा काय बेत आहे ?

सेः—आपण आपलें उरकून आला आहांत ना ?

राः—आह्मी आपलें सगळें उरकून आलों आहोंत–

सेः—तर नुस्ता १८ आणे गाण्याचा बेत ठेवला आहे !

राः—कांहीं चावू ?

सेः—तसा मिळेल कांहीं.

राः—फराळाचा किंवा जेवणाचा थाट कांहीं करायचा होता कीं नाहीं ?

सेः—तो सगळा थाट मीं उद्यां दुपारावर ठेवला आहे.

राः—असें कां केलें ?

सेः—तसेंच करणें जरूर पडलें. कांहीं मंडळी आपल्या बेताबाताप्रमाणें वागणारी आहे–कांहींना तें कांहीं नाहीं. आज तर मंडळी जेवून यायचीच–शिवाय चहा काफी येथें ठेवलीच आहे–उद्यां दुपारचा थाट ज्याला आवडेल तो राहील–नाहीं तो कांहीं उपाशी रहाणार नाहीं–आपला घरीं जाऊन जेवील. आपल्याला कोणाचा दोष घ्यायला नको— अशा बेतानें मी ही सगळी व्यवस्था केली आहे.

राः—बरें काय हो आजची गायक मंडळी कोण आहे ?

सेः—आपण ज्यांना पसंत कराल अशीच आहे !

राः—नांव तरी ऐकूं द्या.

सेः—तें येव्हांशीं गुलदस्तांत ठेवायचें आहे!

राः—गुलदस्तांतसें ?

सेः—त्याला कांही तसेंच कारण आहे.

राः—तें कारण तुह्मीआह्मी मिळूनच गुलदस्तांत ठेवूं—मग तर चालेल कीं नाहीं ?

सेः—मग कांहीं माझ्याकडून हरकत नाहीं—परंतु असें खास ना ?

राः—काय बुवा हा चिकटपणा चालविला आहेत तुह्मी !

सेः—चिकटपणा नाहीं. मी सांगतोंच आहे आतां. हा हो तो आपला टिप्या गवई !

राः—टिप्या ! ! बरें तर हें नांव गुलदस्तांत ठेवून आह्मी आतां स्वस्थ झोंप घ्यायला जातों! आधीं नांव सांगितलेंत, ही एक मोठी आमच्यावर मेहेरबानीच केलींत ! ( जाऊं लागतो. )

सेः—( पदर धरून. ) हें पहालेंत रावसाहेब—याच करतां हें नांव मीं गुलदस्तांत ठेवलें होतें ! आपल्याला हें नांव कळलें नसतें ह्मणजे आपण बसला असतां कीं नाहीं ?

राः—शुक्राचार्य–शिखंडी मंडळीला या टिप्याचा थाट ठिक आहे ! ! आतां मेहेरबानी करा आणि आह्माला जाऊं द्या कसें !

सेः—रावसाहेब-आपल्या करतां दुसरें नांवहि माझ्या गुलदस्तांत आहे ! तें नांव सांगित-

त्यावर, मला वाटतें--मी आपल्याला ढकलून देऊं लागलों तरी आपण जाणार नाहीं !

रा:--कोण-तेच का गृहस्थ ?

से:--पटली तर खुण आपल्याला ! परंतु त्यांनीं आज येण्याबद्दल काय आढेवेढे घेतले ह्मणतां !

रा:--मला वाटलेंच, कीं अशा थाटाला तेच गृहस्थ पाहिजेत ! पण तो मासला कसा काय झाला सांगा पाहूं ?

से:--मासला कसला ! तेथें सगळें काय-देशीर बोलणें चाललें होतें--कायरे तात्या-भट--

ता:--( आंतून येतो. ) काय ? आंत तर मंडळी जमून थाट उडाला आहे--आणि जो तो तुमचा शोध करतो आहे.

से:--अशीच या मंडळीला हावरी केली पाहिजे ! बरें सुपारी द्यायाला तूं गेला होतास ना ?

ता:--बरें मग ?

से:--मग कांहीं नाहीं रे-परंतु तुमचीं तेथें बोलणीं काय झालीं, तीं रावसाहेबांना ऐकूं दे तर खरा.

ता:--भले महाराज--तुह्मी ही तीनशें रुप-यांची घोरपड आमच्या गळ्यांत बांधलीत, आण-खी कांहीं केले नाहींत !

से:--याच्या गळ्यांत घोरपड !

ताः——तुह्मी तेथें आलां होतात ह्मणून तुमच्यावर ती कांहीं घोरपड नाहीं !—समजलात का महाराज ? तुमच्या कडून रुपये पोंचले नाहींत, तर ती पदर माझा धरील—तुह्माला काय ?

सेः——बरें धरूं दें तुझा पदर—त्यांत काय झालें ? तूं नाहीं तर आतां कानांत बोटेंच घालून बसणार असशील ?

राः——तीनशें ? आणि ते एका रात्रीचे ? आणि ते तुह्मी कबूल केलेत !

सेः——तीनशेंच काय पण तीन हजार ह्मणती, तरी तितके आपण रावसाहेब कबूल करतां !

ताः——नाहीं तरी बक्षीस ह्मणून बिदागी दिल्यावर त्यांना कांहीं तरी तुह्माला द्यायला पाहिजेच ! हो हो, न देऊन कसें चालतें !

सेः——अहो, त्यानीं आरग्युमेंटच आधीं असें आणलें, कीं आह्मी पब्लिक पर्सन—आणि त्या करितां आमची अब्रू ज्यास्ती—

ताः——तर मग खोटें का ह्मणाल्या त्या ? तुमच्या सारखी मंडळी तर पायां पडून बोलावते कीं नाहीं त्यांना अशा प्रसंगीं!—सांगा आधीं मला!

सेः——त्या आरग्युमेंटवर आह्मीं आरग्युमेंट कांहीं लढिवलें नाहीं—पण नुस्तें इतकेंच सांगितलें, कीं आजचा असा असा प्रसंग आहे, आणि तो साजरा करण्याला कांहीं मंडळीच्या मनांतून आपल्याला न्यावें असें आहे—ह्मणून गांवांत जी कांहीं आपली फी असेल, तिच्यापेक्षां कांहीं आ-

त्यावर, मला वाटतें--मी आपल्याला ढकलून देऊं लागलों तरी आपण जाणार नाहीं !

राः--कोण-तेच का गृहस्थ ?

सेः--पटली तर खुण आपल्याला ! परंतु त्यांनीं आज येण्याबद्दल काय आढेवेढे घेतले ह्मणतां !

राः--मला वाटलेंच, कीं अशा थाटाला तेच गृहस्थ पाहिजेत ! पण तो मासला कसा काय झाला सांगा पाहूं ?

सेः--मासला कसला ! तेथें सगळें काय-देशीर बोलणें चाललें होतें--कायरे ताल्या-भट--

ताः--( आंतून येतो. ) काय ? आंत तर मंडळी जमून थाट उडाला आहे--आणि जो तो तुमचा शोध करतो आहे.

सेः--अशीच या मंडळीला हावरी केली पाहिजे ! बरें सुपारी द्यायाला तूं गेला होतास ना ?

ताः--बरें मग ?

सेः--मग कांहीं नाहीं रे--परंतु तुमचीं तेथें बोलणीं काय झालीं, तीं रावसाहेबांना ऐकूं दे तर खरा.

ताः--भले महाराज--तुह्मी ही तीनशें रुप-यांची घोरपड आमच्या गळ्यांत बांधलीत, आण-खी कांहीं केले नाहींत !

सेः--याच्या गळ्यांत घोरपड !

ताः—तुह्मी तेथें आलां होतात ह्मणून तुमच्यावर ती कांहीं घोरपड नाहीं !—समजलात का महाराज ? तुमच्या कडून रुपये पोंचले नाहींत, तर ती पदर माझा धरील—तुह्माला काय ?

सेः—बरें धरूं दे तुझा पदर—त्यांत काय झालें ? तूं नाहीं तर आतां कानांत बोटेंच घालून बसणार असशील ?

राः—तीनशें ? आणि ते एका रात्रीचे ? आणि ते तुह्मी कबूल केलेत !

सेः—तीनशेंच काय पण तीन हजार ह्मणती, तरी तितके आपण रावसाहेब कबूल करतां !

ताः—नाहीं तरी बक्षीस ह्मणून बिदागी दिल्यावर त्यांना कांहीं तरी तुह्माला द्यायला पाहिजेच ! हो हो, न देऊन कसें चालतें !

सेः—अहो, त्यांनीं आरग्युमेंटच आधीं असें आणलें, कीं आह्मी पब्लिक पर्सन—आणि त्याकरितां आमची अब्रू ज्यास्ती—

ताः—तर मग खोटें का ह्मणाल्या त्या ? तुमच्या सारखी मंडळी तर पायां पडून बोलावते कीं नाहीं त्यांना अशा प्रसंगीं!—सांगा आधीं मला!

सेः—त्या आरग्युमेंटवर आह्मीं आरग्युमेंट कांहीं लढविलें नाहीं—पण नुस्तें इतकेंच सांगितलें, कीं आजचा असा असा प्रसंग आहे, आणि तो साजरा करण्याला कांहीं मंडळीच्या मनांतून आपल्याला न्यावें असें आहे—ह्मणून गांवांत जी कांहीं आपली फी असेल, तिच्यापेक्षां कांहीं आ-

ह्मी ज्यास्त देऊं. त्यावर त्यांनीं पहिल्यानें बराहे ह्मणून उत्तर तर दिलेंच. उत्तर दिल्यावर आपल्या ठरावाप्रमाणें आह्मी त्यांना सुपारी देऊन निघालों.

ताः—मग काय ह्मणता: त्यांनीं तर यांना चप्पच बशिवलें!—पण त्या थोड्याशा फसल्या खऱ्या—कारण त्या आपली फी एका दिवसाची हजार रुपये जरी सांगत्या, तरी यांना कबूलच करायला पाहिजे होती—हं.

सेः—परंतु त्यांनीं परत बोलावून सांगितलें, कीं उगीच आबादीबांत कशाला पाहिजे—२०० रुपये घेऊं—

ताः—ह्मणतों काय तर मी त्या फसल्या ह्मणून !

सेः—ऐकलें का रावसाहेब—त्यांनीं फार शहाणपणाचा जाब दिला. मी त्यांना इतकेंच ह्मटलें, कीं हें फारच—तिपटी चौपटीवर मान गेलें !—

ताः—तेव्हांच नाहो त्या ह्मणाल्या, कीं आह्मी आपली फी वकील लोकांप्रमाणें कायम करून ठेवली आहे !

सेः—आणि त्याला कारण काय ह्मणाल्या—तर 'विल्हा' एक ! तेव्हां शाबास ह्मटलें आणि बरें ह्मणून आलों ! आणि तें फक्त आपल्या करतां बरें रावसाहेब !

राः—मग आतां उशीर कां ?

से:—माझ्या कडून कांहीं उशीर नाहीं. आपण आंत व्हा तों मागच्या बाजूनें मी आलोंच. ( सर्व आंत जातात. )

म:—तात्याभट—काय तूं येथें असून सगळा आळणी प्रकार केलास ?

ता:—मी काय बुवा करूं—दुसरा कोणी मिळेच ना—तेव्हां तुमच्या करमणुकेला कांहीं पाहिजे, ह्मणून यालाच आपला मी अंजारूनगोंजारून आणला आहे—हो तर काय !

म:—तात्याभट—हें कांहीं बुवा ठीक नाहीं—याच्या गाण्यानें आह्मी तर आजारी पडूं बुवा ?

भा:—टिप्या तू येथें कशाला आलास ? कुणि बोलावलेन तुला ? तुझें गाणें कोण ऐकणार ? जा कसा तूं येथून आधीं.

से:—मल्हारराव, भाऊ साहेब—थोडी माझी विनंति आहे. आपल्या जवळ असलेल्या फंडांत सर्व उरकायचें असें ठरलेलें आहे आधीं.

फि:—प्रसंगाला योग्य काम करण्याकरतां कांहीं ज्यास्त पैसा लागेल तर मागाहून पैसे देण्याला मंडळी कांकूं करणारी नाहीं—

से:—मंडळी ऐकते आहे ना हें बोलणें ?

फि:—न कुणि ऐकलें तर मी देईन.

से:—( मनांत ) मला तरी हेंच पाहिजे होतें! आतां राष्ट्रीयसभेचा भार तुमच्या डोक्यावर कसा येत नाहीं तो पाहीन. ह्मणा तर खरें आतां, कीं हा राष्ट्रीयसभेचा प्रसंग उचित नाहीं, आणि त्या

कारितां आमच्यानें इतका पैसा देववत नाहीं. ( मोठ्यानें. ) तात्याभट, मंडळी जर आजारीच पडायची वेळ आली आहे—तर जा बुवा आणि जे रिकामे सापडतील त्यांना तारेवर टाकून घेऊन ये.

ताः—पण आतां आयते वेळीं—

सेः—रड कांहीं गाऊं नकोस—पैशाकडे कांहीं पाहू नकोस—पांच पन्नास आलिकडे कीं ९०-९० पलिकडे—हूं जा. ( जातो. )

फिः—तात्याभट परत येई पर्यंत—

सेः—पाहिजे तर टिपाजीला उठिवतों. टिपाजी—

टिः—कशाशीं गाऊं महाराज?

सेः—( कानांत. ) अरे ओरड कांहीं तरी.

टिः—अंहः ( गाण्याचें अवसान आणूं लागतो. ) ( तात्याभट परत येतो. )

ताः—नशीब बुवा या मंडळीचें !

सेः—झालें काय? गेलासच नाहीं वाटतें?

ताः—तुह्माला वाटायचेंच तसें—पण ती पहालीत का माझी गाडी.

सेः—थट्टा काय करतोस अशी?

ताः—कृष्णाजीना आणल्या—त्या उतरताहेत, हे त्यांचे साजिंदे पुढें आले !

से—अरे द्यायचें घ्यायाचें काय ठरिवलेंस?

ताः—आतां कां त्याच्या बद्दल? त्या दमून परत चालल्या होत्या, तेव्हां त्यांच्या हाता

पायां पडून ३०० रुपये द्यायचे ठरवून आणल्या आहेत ! तरी त्याना बक्षीस हें हवेंच आहे हो ! ( इतक्यांत कृष्णाजी साजिंद्यासह येते. आणि कांहीं वेळानें गाण्याला सुरवात होते.) ( गाणें आटपल्यावर.)

रा:—आजच्या या जंगी समारंभाच्या थाटाबद्दल आपल्या मोठ्या खटपटी व हौसी सेक्रेटरींनीं फार मेहेनत घेतली याजकरितां मंडळीनें त्यांचे आभार मानावे तितके थोडकेच आहेत !

म:—सेक्रेटरीचे आभार पाहिजे तर माना—परंतु आह्माला वाटतें—काय हो फिरकीराव; ह्या कृष्णाजीचेच मानले पाहिजेत !

फि:—पाहिजेल तर त्यांचे मानावे—पाहिजेल तर यांचे मानावे—नाहीं तर दोघांचेहि मानावे !

कृ:—( उठून बोलणार इतक्यांत.)

म:—अहो अजून आपले आटपलें नाहीं. आपण दमून भागून आला होता, व त्याच्यावरहि येथें पुन्हां गाण्याचे श्रम केलेत—पण आपली बिदागी—

ता:—हं हं बिदागी ह्मणूं नका पण 'फी'

से:—( मल्हाररावाच्या कानांत.) ह्या ९०० रुपयांच्या नोटा फिरकीरावांच्या हातून देववा.

म:—तें माझें काम. ( नोटा विड्यांच्या पानांत घालून फिरकीरावाला.) हे घ्या बुवा आपल्या हातून हा समारंभ साजरा होऊं द्या.

ता:—कृष्णाजी, या अशा पुढें. ( कृष्णाजी

पुढें येऊन उभी रहाते.)

फि:—आज मंडळीनें आपल्याला फार तसदी दिली—

कृ:—मंडळी रोज जरी अशी तसदी देईल—

ता:—तें काय विचारावें! आपला साधूचाच अवतार!

फि:—आपलें मधूर गान ऐकून मंडळी फार खुष झाली आहे! याकरितां फूल नाहीं—पण फुलाची पाकळी या मंडळीनें आपल्यापुढें हजर केली आहे तिचा आपण स्वीकार करावा.

कृ.—(मोठ्या नम्रतेनें विडा हातांत घेऊन सलाम करून परत जाग्यावर गेल्यावर.) माझ्या मनांत दोन शब्द बोलावेत असें आहे.—

फि:—आतां आपण फार दमलां असाल—आणि आपली जरी इच्छा आहे, तथापि आह्मी आपल्याला आणखी त्रास देणें ह्मणजे आमची राक्षसकृता होणार आहे!

कृ:—मेहेरबान साहेब—आपल्या मंडळीला गायन लुब्ध करावें अशी कांहीं आतां माझी इच्छा नाहीं—

से:—गायनाचें असोत अगर बोलायचे असोत—आपल्याला श्रम होत नसतील, तर आपलें भाषण ही मंडळी मोठ्या प्रेमाने ऐकून घेईल!

कृ:—आपल्या सारखी रसिक-दिलदार-नि सरदार मंडळी या मनोहर इमारतींत

एकत्र जमलेली पाहून एकाद्या बाहेर गांवाहून आलेल्या पांथिकाच्या मनांत दर्शनीं काय विचार येतील ! याची कल्पना करणं माझ्या सारख्या स्त्रिला देखील अवघड नाहीं—असं या सरदार मंडळीला सहज वाटेल ! पण मला एक अत्यंत दुःखाची गोष्ट भासते आहे, नि ती या सरदार मंडळीपुढें बोलून दाखवावी कीं नाहीं याच विचारांत मी आहे—

फि:—सेक्रेटरी साहेब—हें कांहीं बक्षीसाबद्दलचें बोलणें दिसतें आहे ! तेव्हां आपली शोभा करून घेण्यापूर्वीच बघा कांहीं.

से:—मला सांगा काय पाहिजे तें—मी हजर करतों ! आज पैशाच्या बाबतींत मागेंपुढें करायचें नाहीं अशी आपली सूचना होण्याबरोबर तात्डतोब मी तयारी करून ठेवली आहे. कृष्णाजीच्या अंगावर पैशाची धार ओतायची असें जरी आपल्या मनांत असेल, तरी तितके रोकड रुपये मी आणून ठेवले आहेत—

रा:—भले बहाद्दर सेक्रेटरी !

से:—करून करायचें मग त्यांत आळस कां ?

फि:—का रावसाहेब—एक हजार रुपये द्या बक्षीस.

रा:—माझ्याकडून दोन हजार !

कृ:—सरदार साहेब—माझी एक विनंति आहे. मी फार थकलें आहे, नि माझ्यानं आतां उभं रहावत नाहीं—तरी दोन हजारांचा

नीं स्वीकार केला असं समजा. पण जी मला दुःखाची गोष्ट वाटते, ती आपल्या पुढें बोलून दाखिवल्या वांचून माझ्यानं तर बसवत नाहीं. या करतां मेहेरबानी करून आणखी कांहीं मला आपल्याला द्यावंसं वाटलं तर द्या—पण हें माझं बोलणं संपेपर्यंत आपले कान व अंतःकरण मजकडे असूं द्या एवढी मी प्रार्थना करतें. (आश्चर्यानें सर्व गप्प होतात.) मी स्त्री आहे—आपल्या सर्वांच्या पाहण्यांतली आहे—पण असं समजा, कीं मी खरोखरीचा एक खेडवळ मनुष्य असून थोडा चतुर असल्यानें स्त्रीवेषानं आपली परिक्षाच घेण्याकरितां येथें आलों आहे—

राः— (मध्येंच) कशाचीरे बुवा परिक्षा ?

कृः—आणखी कशाची नाहीं—पण तुह्मां शहरवासी शहाण्यासुर्त्या व पैकेवान लोकांना आह्मां गरीब लोकांची कशी काय कळकळ आहे, नि ती अंतःकरण कळवळून आहे किंवा दिखाऊ आहे याची परिक्षा—

फिः—ही असली गाणारीण कशाला पाहिजे होती ?

सेः—आयते वेळेला तात्याभटानेंच आणलीन. बाई बोला एकदां कसें—काय तुह्मांला बोलायचें असेल तें !

कः—माझीं खरीं स्वरूपं आपल्या लक्षांत पुरीं असावीं, ह्मणजे क्वचित ठिकाणीं माझ्या बोलण्यांत घोटाळा होईल तो आपल्या लक्षांत येईल.

फि:—( त्रासानें. ) बरें चालू द्या. नाहीं तर मला वाटतें पुन्हां एकादे वेळस बोला.

कृ:—आजचाच समय बोलण्याला चांगला आहे, नि तें मी थोड्यांतच आटपतें. या प्रसंगीं अशा गाण्यांत रंगलेलें, नि हजारो रुपये खर्च करण्यास तयार असलेले पाहून—मी ह्मणेन, कीं हा देसुरी लोकांचा देशकल्याणाच्या संबंधानं नुस्ता "खडेघाट" आहे! देशकल्याणाचं खरोखरीचं बीज यांच्यांत नाहीं—या कारणानं या घाटावर पाणी कितीहि पडलं तरी तें खेळेंळून जाईल! त्याचा कांहीं एक उपयोग नाहीं! आतां लवकरच आपल्या इथें राष्ट्रीय लोकांचा मेळा जमायचा आहे—त्या मेळ्यांत, बाहेर आमचे कसे हाल चालले आहेत, ते आपल्या डोळ्यांनीं पाहून सांगणारा या सरदार मंडळींत एक तरी असेल का? मला वाटतं शून्यच! आपल्या सरदार मंडळीची खेडेगांवांतून जाण्याची फार फार मजल झाली तर माथेरान—खंडाळं—लोणाळं—नाहींतर महाबळेश्वर! नि ती दिखिल हवा खाण्या पुरती! मोठ्या कामाचीच असेल तर एखाद्या प्रस्थाला खुष करण्या करतां—नाहीं तर अमुक ठिकाणीं श्रमातिशयाच्या सबबीनं हवा खाण्या करतां अमुक ठिकाणीं गेलों होतों एवढी वढाई मिरविण्या पुरती! सरदार हो, या ठिकाणीं मी कांहीं आपल्याला उपदेश करण्या करितां आलें नाहीं—आपल्या बोलावण्या प्रमाणं मी येऊन कामगिरी ब-

जावली–तिची आपण आपल्या नांवालौकिका प्रमाणं मला फीहि दिलीत–याबद्दल सर्वशक्ती-मान देवाजवळ मी प्रार्थनाहि करीन–परंतु आपल्या जवळ माझी विनंति आहे, ती अशी, कीं आपण थोडीशी पुढच्या सृष्टीवर नजर पोंचवा–ह्मणजे आपल्या पुत्रपौत्रांकडून जें आपल्याला लंछन येणारं आहे, तें टळलं जाईल. नाहीं तर चेहऱ्या मोहोऱ्यांत–रेखलेल्या चित्रा सारखे ! कष्टसंपादित विद्येंत–केवळ भारवाहक ! बुद्धिमत्तेंत–अनिश्चित ! विचारांत–उष्टावलेले ! नि द्रव्य संचयांत पराची धन करणारे ! असं आपल्याला ह्मणवून घ्यावं लागेल !

फिः—बस्स–पुरें करा हो आतां आपलें पांडित्य—

कृः—( हात जोडून.) मी पुरंच केलं होतं–पण आतां हें शेवटलंच बोलतें. आतां राष्ट्रीय समारंभ अगदीं नजीक येऊन ठेपला आहे–तेव्हां आपल्या चित्रीत मुखवट्यांत थोडंसं चैतन्य घाला-विद्येचा भारवाहकपणा सोडा–बुद्धि निश्चित करा-विचारांत स्वातंत्र्य आणा–नि द्रव्य स्वकार्य उपयोगी लावा–इतक्या गोष्टी कराल, तर राष्ट्रीयसभे पासून इच्छित लाभ प्राप्त होण्याची वेळ येईल–आतां मी सर्व मेहेरबानांना सलाम करून रजा घेतें. ( सांजियासह जाते. )

राः—अहो मेहेरबान सेक्रेटरी साहेब–ते लोक उपासी चालले आहेत; त्यांना राहवून घ्या !

फि:—व्हॉट?—नान्सेन्स ! असल्या चावट वा-यका काय उपयोगाच्या !

रा:—काय त्यांच्या बोलण्यांत चावटपणा होता ?

से:—चावटपणा आपण ह्मणतां, या वांचून त्यांच्या बोलण्यांत मला कांहीं दिसत नाहीं—पण त्यांनीं थोडक्यांतच वर्णन केली तशी स्थिती पहाण्या करतां जाण्याची कुणि तयारी करतो आहे काय ?

दोघे चौघे एकदम:—गेले पाहिजे—अलबत. ( इतक्यांत भोजनाच्या तयारीची घंटा होतें—सर्व जातात. )

---

## प्रवेश ५ वा.

### स्थळ:—घर.

**पात्रें:**—भाऊसाहेब—चिमणाबाई—( भाऊसाहेबांचें कुटुंब ) आणि बाळासाहेब.

चि:—( जसें कांहीं आपल्याशींच. ) आज मी तर आपल्या मनाचा धडाच केला आहे, कीं—त्या राष्ट्रीयसभेची किंवा दुसरी अशी कोणतीच गोष्ट आपण होऊन कांहीं कुणाला विचारायची नाहीं. आपलं सहजीच तिकडून होऊन कांहीं बोलणं झालं—तर ऐकायचं नाहीं असा मात्र कांहीं मी नेम करीत नाहीं, पण तें बोलणं उजव्या कानानं ऐकलं, तर डाव्यानं बाहेर सोडून द्यायचं—नि डाव्यानं ऐकलं, तर उजव्यानं

सोडून द्यायचं !

भा:—(रोखानें.) आजचा हा थाट कांहीं निराळाच दिसतो आहे बुवा ! पण आह्मी तरी आधीं आमच्या घरांतच आहोंत का ?—नाहीं ! उत्तरच सांगणारें कुणि नाहीं !—

चि:—सगळीं माणसं आपापल्या घरीं आ-हेत—ज्याचीं तीं आपापल्या घरींच असल्यावर त्यांना उत्तर द्यायला दुसरीं कोण असायला पाहिजेत !

भा:—हां हां—आपलीच का स्वारी आहे ? तर मग आतां आह्मी खास जागेच आहोंत यांत कांहीं संशय नाहीं!—नाहीं तर आह्माला असें वाटत होतें, कीं आह्मी झोंपेच्या भरांत येणाऱ्या पूर्वीच्या स्वप्नसृष्टींत निमग्न असून आमच्या समोर कुणि एक स्त्री मोठ्या रागांत उभी आहे !

चि:—बोलण्यांत साखर कशी पेरावी हें जर कुणाला शिकून घ्यायचं असेल, तर त्यानं इथें कांहीं दिवस उमेदवारी करावी !

भा:—तरीच हें काम आपल्याला चांगलं साधलें आहे ! आणि ह्मणूनच चहाला आतांशा साखर आणायची नाहीं असा आह्मीं ठराव केला आहे !

चि:—चहाच्या दुपटीनं—किंबहुना त्याच्या-पेक्षां ज्यास्तच आमच्या इकडील काळ्या तुळशी काम करीत असून काय जी गोडी पहावी, तीं आपली समुद्रापलिकडच्या आलेल्या जिनसांवर !

भा:—बरें पण आपल्याला समजलें कां—छें छे चुकलों ! असें नाहीं विचारायचें— परंतु आह्मी आतां दोन महिने बाहेर गांवीं फिरायला जायचा बेत केला आहे.

चि:—कुठें यात्रेला जायचं असलं, तर माझ्या-शिवाय ती सफळ व्हायची नाहीं—मी बरोबर असलेंच पाहिजे.

भा:—हा असा कांहीं आग्रह आपण धरूं नका. आणि आपल्याला आह्मी इतक्या उंच प्रतीचें शिक्षण दिलें आहे—तथापि धर्मसंबंधीं हे वेडेवेडे विचार अजून आपल्या मनांतून हाललेच नाहींत ना ?

चि:—' हारिझोंटल् एग्झरसाइझ ' ह्मणजे सूर्याला घालायचे नमस्कार, साता समुद्रा पलि-कडील लोकांनीं सुरू केले—तरी दिखील आमच्या इकडील धर्मसंबंधी गोष्टींना वेडेवेडे विचार ह्मणायचं हें आहेच !

भा:—बरें आमच्या धर्मसंबंधीं कल्पांना आह्मी वेडेवेडे विचार ह्मणत नाहीं—नाहीं परंतु ह्मणणार नाहीं—आतां तर झालें ना ! पण तुर्त यात्रेला जाण्याचा आमचा विचार नसून कांहीं देशसे-वेला जाण्याचा आह्मीं विचार केला आहे—

चि:—देशसेवेला ! !

भा:—आपल्याला फारसें आश्चर्य वाटलें ?

चि:—आत्तां तोंडांतून तो प्रश्न निघत होता—पण आवरला गेला ह्मणून बरं झालं—

भाः—विचारा विचारा—आपल्याला सांगायचें नाहीं तर मग कोणाला ?

चिः—असं गोड गोड बोलायचं आधीं—नि मग विचारल्यावर रागानं असलाला डोळा वटारायचा ! नको मेलं तें विचारणं नि मग रागावून घेणं !

भाः—ठरलेल्या संकेताप्रमाणें आमचे मित्र बाळासाहेब येण्याची वेळ झाली आहे—ह्मणून आपण विचारण्याची आतां वाट न पहातां आह्मीच आधीं सांगून टाकतों. वार्षिक प्लेझरपार्टीला काल बसलों असतां, उठता उठतानां देशसेवेला जाण्याचा आह्मी आणि बाळासाहेबांनीं निश्चय केला आहे. त्या प्रमाणें ते येथें आल्याबरोबर एकदम निघायचेंच.

चिः—देशसेवा करणं ही एक प्रकारची महायात्राच आहे; तिच्या आड येऊन पाप कुणि पदरीं बांधावं—पण आपलं पोझिशन ?—

भाः—त्या पोझिशनमध्यें कांहीं अर्थ नाहीं—आणि जगांत तसलें पोझिशन असण्यापेक्षां मरणंच फार चांगलें असें आह्माला वाटायला लागलें आहे !

चिः—नवलच तर बाई असं ह्मणायचं ह्मणजे !

भाः—आमचें ‘ पोझिशन राखणें ’ ह्मणजे आह्मी स्वतःला दुसऱ्याला विकून घेणें असें आहे! आणि असलें पोझिशन संभाळणारे शंभर इसम

असले तर त्यांत खरोखर कांहींसा फायदा एका-द्याचाच होतो! त्यापेक्षां जनसमूहांत आपण आपलें थोडेसें पोझिशन केलें—तर त्यांत परमार्थ साधून स्वार्थ, अथवा स्वार्थ साधून परमार्थ, या पैकीं एकादें तरी खास प्राप्त व्हायचेंच; आणि पुन्हां आपल्या स्वातंत्र्याला धक्का नाहीं! परंतु पहिल्या प्रतीचें हें 'फॉलस पोझिशन' राखण्यांत 'जरतर'चा गडबडगुंडा करण्यांत जी त्रेधा उडत असते—तशा वेळीं शास्त्रीय पाप-भीतिचें गुंडाळें समुद्रांत फेंकून दिलेलें असतें ह्मणून ठिक—नाहीं तर हें असलें बंधूद्रोहाचें आणि देशद्रोहाचें महापातक आमच्या समोर भयंकर मुद्रा धारण करून उभें रहातें, आणि अशा नीच कर्मापासून ओह्माला पराङ्मुख करतें!

चि:— ( आपल्याशींच ) ही किनई बाई ख-रोखरीची अशी उपरति झाली असेल—तर हें देवानंच गाऱ्हाणं ऐकलं ह्मणायचं!

भा:—ह्मणून हें असलें 'फॉलस पोझिशन' आतां आपल्याला नको, आणि खरोखरीच त्याचा आतां आपल्याला वीट आला आहे! आतां आ-पण तर इतःपर निश्चयच केला आहे, कीं हा आपला क्रम बंद करून होईल तितकी देशसेवाच करायची, आणि याच हेतूनें आज आह्मी बाहेर गांवची खेड्यापाड्यांतून स्थिती पहायला जा-ण्याचा निश्चय केला आहे.

चि:—अशाच हेतूनं आपलं बाहेरगांवीं जोंपर्यंत रहाणं होईल–तोंपर्यंत मी तुळसाईची आपल्या उद्योगाला यश येण्याबद्दल प्रार्थना करीत जाईन.

भा:—आपण जाण्याची आह्माला परवानगी दिलीत येवढ्याच करतां आह्माला मोठा संतोष झाला आहे–(इतक्यांत बाळासाहेब येतात.)

बा:—कसें काय भाऊसाहेब? आपल्याला काय कोणाच्या परवानग्या वगैरे घ्यायच्या होत्या त्या मिळाल्या का? (हें ऐकून चिमणाबाई लाजू-न आड होते.)

भा:—आपलें काम उरकलें का सगळें?

बा:—फार भानगडी पडल्या होत्या—पण त्या कांहीं आतां सांगत बसत नाहीं. सांगतों इतकेंच, कीं ही आतां निघण्याची तयारी आहे.

भा:—माझीहि अशीच आतां तयारी आहे.

बा:—असें जर असेल, तर मुक्कामाला आधीं आपण कुठें बाहेर जाऊं–आणि आपले कांहीं न्यायसवरायचें विसरलों असलों तर मुक्कामाहून मागवूं. कारण आपल्याबद्दल गांवांत गप्पा फार सुरु झाल्या आहेत.

भा:—असें? तर चलाच आतां. (जातात.)

---

## प्रवेश ६ वा.

**स्थळ:**—जगदंबेचें देऊळ.

**पात्रें:**—दर्शनाला आलेल्या स्त्रिया—

(सरस्वतिबाई आणि चिमणी बोलत येतात.)

चि:—तुह्माला आमच्या इथली बातमी कळली असेल ?

स:--कसली बातमी ? मला कांहीं कळली नाहीं बाई !

चि:—असं कसं होईल पण तें मेलं! आमच्या इथें कांहीं करायचं झालं, तरी पहिल्यानं त्याचा विचार तुमच्या घरांत व्हायचा, नि मग घरीं सांगण्यासारखं असल्यास सासूबाईंना कळवायचं व्हायचं.

स:--भाऊभाऊजी कांहीं दोन चार दिवसांत कुठें आमच्याकडे आलेले दिसले नाहींत, नि घरांतूनय कांहीं भाऊजीविषयीं बोलायचं झालं नाहीं.

चि:—काल बाळासाहेब नि आमच्या इथें बाहेरगांवीं फिरायला जायचं झालं.

स:—बरोबर कोण गेलं आहे ?

चि:—ब्राह्मण किंवा गडी कुणि दिखील बरोबर नाहीं—फराळाचं थोडं कारपेटव्याग भरून देतें ह्मटलं, तर तें दिखील कांहीं घ्यायचं झालं नाहीं—इतकी जायची घाई झाली !

स:—मग कुठें जवळच जाऊन यायचं असेल.

चि:--आतां दोन तीन महिने परत यायचं नाहीं असं ह्मणायचं झालं होतं !

स:--गांवाचं नांव तरी काय सांगितलं ?

चि:—गांवाचं नाव विचारलं, तर सांगायचं झालं–कीं देशसेवेला ! या गांवाहून त्या गांवीं, नि त्या गांवाहून पलिकडच्या गांवीं !

स:—आमच्या इकडले पुरुष जें जें कांहीं करतात–तें तें आपलं नवलच जसं कांहीं ! कोणत्याहि करण्याचा आधीं विचार करायचा नाहीं–नि फसल्यावर मग पस्तावायचं !

चि:—जाण्याचा विचार ठरायला असं ह्मणायचं झालं, कीं परवां प्लेझर पार्टीतून उठतांना बाळासाहेबांचा नि आमच्या इथला देशसेवेला जाण्याचा विचार ठरला !

स:—इंदुप्रकाश पत्राचं वारं तर नसेलना भरलं यांच्या अंगांत कांहीं ! त्या पत्रानं मोठ्ठा अट्टाहास करून विधवांचे ह्मणे शास्त्रोक्त एक दोन पुनर्विवाह लावलेन ! अशा सारखाच गांवोगांव फिरून जर काहीं 'सोशिअल रिफॉर्म' करण्याचा उपदेश करीत फिरायचं असलं–तर नस्ती विघ्नं हे राष्ट्रीयसभेला आणतील !

चि:—मला तरी बाई हाच धाक वाटतो आहे ! एकदां माझ्या मनांत आलं होतं–कीं हें आपण बोलावं. पण पुन्हां मनांत ह्मटलं कीं नको बाई–

स:—बरं केलंस बोलली नाहींस तें. कारण अशा पुरुषांच्याजवळ असं कांहीं बोलून उपयोग नाहीं.

चि:—तेच असं ह्मणत असतात, की राज-

कीय हक्क मागण्या पूर्वीं आधीं आपल्या घरांत सुधारणा केली पाहिजे!

सः—आतां आमच्यांत ती काय यांना सुधारणा करायची आहे? आह्माला का लिहिता वाचता येत नाहीं—का स्वयपाक करतां येत नाहीं—का सासू सासऱ्या जवळ कसं मर्यादेनं वर्तन करावं हें कळत नाहीं—का मुलांची सुश्रुषा करतां येत नाहीं—का प्रपंचाला काय लागणारं तें आह्माला कळत नाहीं ह्मणून आमची सुधारणा करण्याचं यांचं आडलं आहे?

चिः—आपण सोवळींओवळीं सोडावीं—विटाळचंडाळ माजवावा—आपले हक्क पुरुषांच्या बरोबरीनं आहेत ह्मणून त्यांच्या बरोबर भांडायला लागावं—नशीबानं वैधव्य प्राप्त होणाऱ्या स्त्रियांनीं पुनर्विवाह करावे—गायला नाचायला शिकावं—पुरुषांच्या बरोबर फिरायला जावं—सारांश ढालगजपणा करायला तयार व्हावं—हें अशा प्रकारचं कर्णं ह्मणजे काय तो सोशिअल रिफार्म!

सः—या आपल्या बायका शिकून असे वेडेवेडेचार करायला लागल्या ह्मणून आमच्या घरीं वाईट वाटायला लागलं आहे असं आतांशा ह्मणायचं असतं!

चिः—फिरायला गेल्या सारखं एकादं चांगलंसं कांहीं काम केलं तर लोक दुवा तरी देतील.

सः—मी ह्मणतें—पण काय हो चिमणाबाई, आतां भाउजींच्या मनांतली भीती गेली का?

चि:—मला तरी काय ठाऊक ! पण जाते वेळीं मला बरोबर न्यायचं नाहीं असं जेव्हां ह्मणायचं झालं, तेव्हां मी इतकं मात्र ह्मटलं—कीं देशसेवेला जायचं आहे तोंपर्यंत, यश यावं ह्मणून मी रोज तुळसाईला प्रदक्षणा घालीत जाईन.

स:—मला वाटतं आतां इथल्या इथेंच जर हीं मनं बदलायला लागलीं आहेत, तर बाहेर गांवीं फिरल्यानं थोडी ज्यास्ती बदलतील—

चि:—देव करो नि खरी सुधारणा कुठें आहे, हें आमच्या पुरुषांना कळो ह्मणजे झालं !

स:—आतां उशीर नाहीं का झाला आपल्याला !

चि:—चला तर बाई—(जातात.)

---

## प्रवेश ७ वा.

**स्थळः**—गटारयंत्र.

**पात्रें:**—जमलेले लोक. काका पाध्ये—पिलंभट—रंगुभट—वगैरे.

का:—पिलंभट—

पि:—काय ह्मणता काका ?

का:—अरे आतांशा ही आपल्या शहरांत धांदल कशाची चालली आहे ? आणि पहातों तों आतांशा आठ आठ दिवसांत देखील छटाकी झोडायला सांपडत नाहीं !

पि:—काका—आतां तिचीच तर ही धामधुम

चालली आहे ! कायरे रंगुभट--

रं:—काका–तुह्मी कां नाहीं आतां छटाक्या झोडायला पेनसल घेऊन लवकर वर जा कसे !

का:—मेल्या फुटलें तुझें कपाळ—नुक्तीं मला कुठें ९६ वर्षे होऊन ९७ वाच्या घरांत मी आलों, आणि आमचा रामू नुकतासा कुठें रोजगार करायला लागला आहे—तोंच आपला रंगुभट मला ह्मणतो 'काका तुह्मी आपलें पेनसल घेऊन लवकर वर जा कसे !'

पि:—काका, अहो तसें नाहीं—

का:—तूं देखील आतांशा सोद्यांतलाच भट झाला आहेस !

पि:—बरें काका, ही धामधुम कशाची चालली आहे, ती कळली का तुह्माला ?

का:—पिलंभट तीच नारे मी तुला विचारली ?

पि:— हो हो काका–मी विसरलों बरका !

रं:—पहालत काका !

पि:—काका, ही धामधुम राष्ट्रीयसभेची आहे—

का:—अरेच्चा ! रंगूभट, कायरे वेड्या हें ?

रं:—काका–ती की नाहीं, हिंदुस्थानांत रहाणाऱ्या ठिकठिकाणच्या लोकांच्या तर्फेनें निवडलेल्या लोकांची ही सभा भरणार आहे !

का:—हं हं ! अरे व्हावारे !

पि:—आणखीं ते काय करणार तें कांहीं

कळलं का तुह्माला ?

का:—नाहीं नाहीं—मग ही सभा काय करणार ?

पि:—आतांशा पहातांना आठ आठ दिवसांत छटाकीचें आमंत्रण नाहीं !—

का:—हो हो–तेंच तर मी ह्मणतों आहे ! कीं लोक धर्मविमुख का होत चालले आहेत ?

रं:—काका लोक धर्मविमुख होत नाहींत–

का:—तर मग ?

पि:—भिकारी होत चालले आहेत—

रं:—नाहीं; झाले–झाले वरें का भिकारी !

का:—झाले असतील बुवा ! मग सभा करून का आतां लोकांना श्रीमंत करायचा बेत आहे ?

पि:—अशांतलाच कांहीं बेत आहे खरा !

का:—हं हं–अरे वाहावारे लोकांनो ! वरें वरें बुवा–मग तें कसें काय श्रीमंत करणार !

पि:—आतां कीं नाहीं काका–तो काय आतां मोठा जमाव जमायचा आहे !

का:—मग जमाव जमून तें काय करणार आहेत !

पि:—त्या जमावांत आपल्या हिंदुस्थानांतल्या मोठाल्या शहरांतले हिंदु–पार्शी–मुसलमान–साहेब —असे लोक जमायचे आहेत !

का:—अरे त्रेच्या ! आणखीं ?

पि:—आणखीं आपल्याला श्रीमंत करायच्या

गोष्टी त्यांत बोलणार आहेत !

का:—त्या कोणत्या ?

पि:—आतां तुमचा नातू कालेजांत जाऊन पांच चार परिक्षा मोठाल्या उतरला आहे—त्याला मोठी थोरली कलेकटराची जागा मिळावी असा अर्ज सरकारास करणार आहे.

का:—रंगूभट खरेंच कारे ? आमच्या बाळ्याला ! आमच्या रामूला का ?

रं:—काका खरेंच बरका—

पि:—आणखीं काका—परवां तुमच्या शेतांतल्या वेड्यांतून वाघानें दोन गाई नेल्या, त्या वाघाला मारण्याकरतां बंदुका बाळगायचा तुह्माला हुकूम मिळावा ह्मणून अर्ज करायचा आहे—

का:—मग तर बुवा फार नामी होईल !

पि:—आणखी तुमच्या गुरांना चारा मिळत नाहीं—

का:—हो हो पण त्यांच्या करतां तर कांहीं तरी पाहिजे—अरे आह्मी उपासी मेलों तरी चालेल—रंगुभट तूं देखील उपासी मेलास तरी चालेल रे—

रं:—काका, मी उपासी मेलों तरी चालेल ना ?

का:—अरे तीं मुकीं जनावरें ! त्यांना खायला मिळालें नाहीं तर तीं पटापट जागच्या जागेवर मरून जायचीं रे !

पि:—काका, त्यांच्या करतां गायरानें सर-

कारानें खुलीं करावीं असा अर्ज सरकारालं द्यायला—

का:—झालें एवढेंच ?

पि:—नाहीं—आणखी आहे ना!—मिठा-वरची जकात कमी करावी—

का:—तर मग मी आपल्या शेतांतल्या बै-लांना मीठ लावीन !

पि:—जमिनीचा सारा जमीनीच्या मगदुरा माफक करावा—

का:—मग आमच्या शेतकरी लोकांचीं पोटें भरतील तर कांहीं !

पि:—राबाला आणि जळाऊ लाकडांना जंगलें लोकांना खुलीं करावीं—

का:—अरे व:!—मग तर काय चैन उडेल बुवा !—पण या इतक्या गोष्टी आमचे हे लोक करणार ?

पि:—मग कोण करणार तर ? हेच !

का:—ह्यांना कांहीं करायचें ह्मणजे हे कुटून तरी कांहीं मडमा आणतील—बायकांच्या शाळा घालतील !—त्यांना कांहीं तरी शिकवतील, आणि त्यांच्या संसाराचे वाटोळें करतील ! नाहीं तर एकादीचा पुनर्विवाह लावतील ! फार शहाणपण करूं लागले—ह्मणजे देवीउपासनेला लागतील—आणि जाती मोडून टाका ह्मणून ह्मणतील !

पि:—काका—तुह्मी ह्मणतां तसा वेडेपणा

त्यांना काय करायचा ते आपले स्वतः करतील—परंतु या सभेंत तसें कांहीं नाहीं हो! पण काका आपल्यांतल्या बायका फार शहाण्या! त्यांनीं या पैकीं कांहीं मंडळीला चांगल्याच ताळ्यावर आणलें आहे! या असल्या वेडगळ सुधाऱ्यांच्या कामांत आपण पुन्हां पडायचें नाहीं, ह्मणून कैकांनीं आपल्या बायकांच्या गळ्यावर हात ठेवून शपथा घेतल्या!

का:—भले शाबास! अशा बायका आहेत ह्मणून कांहीं आज आमचा धर्म रहाला आहे! नाहीं तर या बाऱ्यांनीं केव्हांच दिवे लावले असते!

रं.—पिलंभट, अरे परवां त्या मदनबागेंत का कायसें काय त्याला ह्मणतात पहा हो—

पि:—बरें मग पुढें?

रं:—नाहीं पण काय नांव पहा हो—आमचे यजमान गेले होते!

पि:—प्लेझरपार्टीला होय—हं.

रं:—तेथें काय जेवण्याचा ह्मणतात बिसमिल्लाच झाला!

पि:—त्या भ्रष्टाकाराला शास्त्रांतच प्रायश्चित्त सांगितलें नाहीं!

रं:—आमचे यजमान त्यांत कांहीं जेवायला राहले नाहींत ह्मणा.

पि:—जेवायला न रहायला काय झालें? कारण सर्व जातींनीं प्लेझरपार्टीला एके ठिकाणीं

कारानें खुलीं करावीं असा अर्ज सरकाराला द्यायला—

का:——झालें एवढेंच ?

पि:——नाहीं—आणखी आहे ना!–मिठा-वरची जकात कमी करावी—

का:—तर मग मी आपल्या शेतांतल्या बै-लांना मीठ लावीन!

पि:——जमिनीचा सारा जमीनीच्या मगदुरा माफक करावा—

का:——मग आमच्या शेतकरी लोकांचीं पोटें भरतील तर कांहीं!

पि:—रानाला आणि जळाऊ लाकडांना जंगलें लोकांना खुलीं करावीं—

का:——अरे व:!—मग तर काय चैन उडेल बुवा!——पण या इतक्या गोष्टी आमचे हे लोक करणार ?

पि:——मग कोण करणार तर ? हेच!

का:—ह्यांना कांहीं करायचें ह्मणजे हे कु-टून तरी कांहीं मडमा आणतील–बायकांच्या शाळा घालतील!—त्यांना कांहीं तरी शिकि-वतील, आणि त्यांच्या संसाराचे वाटोळें कर-तील! नाहीं तर एकादीचा पुनर्विवाह लाव-तील! फार शहाणपण करूं लागले—ह्मणजे देवीउपासनेला लागतील—आणि जाती मोडून टाका ह्मणून ह्मणतील!

पि:—काका–तुह्मी ह्मणतां तसा वेडेपणा

त्यांना काय करायचा ते आपले स्वतः करतील—परंतु या सभेंत तसें कांहीं नाहीं हो! पण काका आपल्यांतल्या बायका फार शहाण्या! त्यांनीं या पैकीं कांहीं मंडळीला चांगल्याच ताळ्यावर आणलें आहे! या असल्या वेडगळ सुधाऱ्याच्या कामांत आपण पुन्हां पडायचें नाहीं, ह्मणून कैकांनीं आपल्या नायकांच्या गळ्यावर हात ठेवून शपथा घेतल्या!

काः—भले शाबास! अशा बायका आहेत ह्मणून कांहीं आज आमचा धर्म रहाला आहे! नाहीं तर या बाव्यांनीं केव्हांच दिवे लावले असते!

रं.—पिलंभट, अरे परवां त्या मदनबागेंत का कायसें काय त्याला ह्मणतात पहा हो—

पिः—बरें मग पुढें?

रंः—नाहीं पण काय नांव पहा हो—आमचे यजमान गेले होते!

पिः—प्लेझरपार्टीला होय—हं.

रंः—तेथें काय जेवण्याचा ह्मणतात बिसमिल्लाच झाला!

पिः—त्या भ्रष्टाकाराला शास्त्रांतच प्रायश्चित्त सांगितलें नाहीं!

रंः—आमचे यजमान त्यांत कांहीं जेवायला राहले नाहींत ह्मणा.

पिः—जेवायला न रहायला काय झालें? कारण सर्व जातीनीं प्लेझरपार्टीला एके ठिकाणीं

जमून जेवायला वसणें हा कांहीं शास्त्रानें गुन्हा ठरत नाहीं !

रं:—आमच्या वहिनीबाईचाच धाक तसा आहे ! आज भाऊसाहेबांच्या बरोबरीनें त्या शिकल्या आहेत.

का:——पिलंभट—तो काय गम्मत सांगतो आहे तेवढी सांगू दे.

रं:—कुणि कृष्णाजी ह्मणून एक नायकीण आहे.

पि:—असेल—

रं:—तिनें यांच्या जवळून २।३ हजार रुपये आपल्या गाण्याबद्दल घेऊन——

का:—२।३ हजार रुपये ! अबबब ! !

रं:—२।३ हजार रुपये उपटून राष्ट्रीय कामांत हे लोक चुकारपणा करतात ह्मणून जी काय यांची पुजा केली आहेन ह्मणता !

का:——त्या नायकिणीनें ?

पि:——ती नायकीण कशाची ?

रं:—मग ती कोण होती तर ?

पि:—तो सोंग घेतलेला कोण असेल तो असो ! पण हें कृत्य या लोकांची अशी खोड मोडण्याकरतां कुणि तरी चांगल्या मनुष्यानें केलें असावं असें कांहीं लोक बोलतात !

रं:—तो सोंग घेतलेला मनुष्य यांना इतकें बोलला तरी ओळखतां आला नाहींना ?

पि:——त्याचा त्यांनीं पुष्कळ शोध केला—

पण साजिंदे ह्मणतात कृष्णाजीच होत्या !

रं:—असूं द्या कीं कुणि—पण त्या कृष्णाजीनें ' देशकल्याण ' ह्मणजे कसें करावें हें सांगून या लोकांना लाजिवलेन्—आणि त्याचाच परिणाम आमचे भाऊसाहेब बाहेरगांवची स्थिती पहाण्याकरतां गेले आहेत ह्मणतात !

पि:—पण काका या कामाकरतां आपल्या भिक्षुक मंडळींतून या सभेला कांहीं वर्णी दिली पाहिजे ! मला वाटतें आपल्या भिक्षुक मंडळींतील प्रत्येकानें एकेक गोप्रदान द्यावें—

का:—आणि त्यांत गाईचा संबंध आहेच—तर रंगुभट माझी पावली !

रं:—काकांची पावली—तर मला पावली !

पि:—तर रंगुभट तसें नाहीं—काका पाद्ध्यांस पावली तर इतरांस चवली नको का ?

रं:—पाद्ध्यांस पावली तर इतरांस चवली हें ठीक—( जातात. )

---

## प्रवेश ८ वा.

**स्थळः**—रस्ता—रान, इत्यादि.

**पात्रेः**—भाऊसाहेब—बाळासाहेब—जानबा—ग्यानबा ह्यादबा—येसबा—येसकर ( गांवचा महार. ) घेलचप्पा मारवाडी ( सावकार. ) पाटील आणि कुळकर्णी. मेरि क्रब—निराश्रित लोकांचा फिरणारा मेळा.

भा:—ऐकलेंत बाळासाहेब ! या करतांच

तर फिरकीराव नेहेमीं ह्मणत असतात, कीं आपल्या जागेवर बसून धुरीण बनणें चांगलें ! या शहरांत आपण आलें—येथील लोकांना राष्ट्रीय विचार करण्याच्यासंबंधानें पाचारण केलें—परंतु एकानें तरी पाचारण केल्याप्रमाणें हजर व्हायाचें होतें—किंवा निदान आमची मुलाकत तरी करून घ्यायची होती !

बा:—मग भाऊसाहेब आपलें काय ह्मणणें आहे ?

भा:—अशा अविचारी लोकांकडे जाणें ह्मणजे आपली मानहानि करून घेणें आहे—तर बेहेत्तर अशा लोकांचें मुखावलोकनं न करावें तें !

बा:—एकून बः ! हा मात्र खरा आपला दरबारीबाणा ! दरबारी ह्मणवून घेण्याची आपल्याला हौस मात्र आहे—परंतु दरबारी बनण्याला अंगांत कोणती करामत हवी लागते, तिचा मात्र आपल्याजवळ गंधहि नसतो—याचा कांहीं विचार नाहीं !

भा:—काय हो बुवा तुह्मी हें असें बोलतां ! तर मग काय—आह्मी आपलें नुक्सान करून या ठिकाणीं पायांचें भाडें द्यायला आलों, तें फुकटच वाटतें ?

बा:—फुकट नाहीं विकत आला ह्मणा—पण त्या दरबारी बाण्याची किल्ली जर आपल्याजवळ नाहीं, तर त्या येण्यापासून काय उपयो-

ग ! असा आपला अपमान करून घेऊन लोकांनाचें दूषण देऊन जायचें कीं नाहीं ? !

भा:—काय हो त्यांत किल्ली आहे !

वा:—त्यांतली किल्ली मी आपल्याला सांगतों—ती आपल्याला कळेल—पण उमजेल कीं नाहीं याचा मात्र मला थोडासा संशय आहे !

भा:—बोला बोला ! आमच्यांतलेच तुह्मी देखील आह्माला भलत्याच माळेंत घालूं पहाता तर !

वा:—लोकांच्या मतानें मेरुसुद्धां आपली माळ ठरलीच आहे—परंतु त्या माळेंतून तुटून पडण्याकरितां तर आपण हे खऱ्या देशसेवेला बाहेर पडलों आहोत !

भा:—किल्ली सांगा हो आधीं.

वा:—ज्या ठिकाणीं आपण आलांत, त्या ठिकाणचे ५।२५ टाक हातीं धरून त्यांतल्या त्यांतच कुणि तरी आधीं खंडोबा बनवायचे !

भा:—मग आह्मी काय केलें तर ?

वा:—करायचें तें चुकलेंत आणि आपणच खंडोबा बनलेत !

भा:—( शर्मून.) भलतेंच कांहीं तरी !

वा:—याच आपल्या कृतीनें लोकांत आपलें जसें वजन पडावें तसें पडत नाहीं ! सगळाच मान जर आपण घेऊं लागलों, आणि तोहि आपली पिशवी संभाळून—तर आपल्या एकट्याला

तो मान कसा मिळावा ! परंतु अशा वेळीं तो मान तर आपल्याला मिळत नाहींच—उलट हेच लोक आपल्याला आपण होऊन शत्रु करून घेतों !

भा:—बाळासाहेब, आपण देशसेवेकरतां निघालों आहोत—आतां माझ्या लक्षांत आलें, माना करतां नाहीं !

बा:—असेंच आणखी डोकें थोडें शांत करा, ह्मणजे देशसेवा करणाऱ्याला आपला सगळा मान गुंडाळून ठेवलाच पाहिजे; इतकेंच नाहीं, परंतु आपल्या पैशाची थैली खुलीच केली पाहिजे असें वाटूं लागेल.

भा:—अशी एकेक गोष्ट आपल्या मनांत येऊं लागली खरी !

बा:—हें देशसेवेचें बरेंच असें आहे—परंतु तें खरोखरीचें मात्र भरलें पाहिजे, ह्मणजे कुणिहि देशसेवेचें एकादें क्षुल्लक जरी काम केलें-तथापि तो मनुष्य आपला आवडता होऊन, त्याला आपण खंडोबा बनवूं लागाल—आणि आतां सारखें ‘ आहे हें एक चांडाळचौकडीचें काम ’ असें ह्मणणार नाहीं ! अहो चोंहोकडून चार चौघे येऊन कांहीं कामें करूं लागतील, तरच या प्रचंड देशसेवेचा भार बिनबोभाट आवरला जाणार आहे. ह्मणून देशसेवेच्या संबंधानें कोणतेंहि काम कोणीहि, त्यानें आपल्या स्वत:च्याच खर्चानें केलें असेल, आणि तसें करण्यापूर्वी त्यानें

जरी आपल्या सारख्या ठळक मंडळीला विचारलें नसेल, तरी त्याला बोलावून आणून आपण होऊनच त्याचा मान करीत गेलें पाहिजे. अशी एकदां वहिवाट सुरू होऊन ज्याचा त्याला योग्य मान मिळूं लागला–तर मग हो काय विचारतां? आपल्यासारखा मनुष्य प्राव्हिन्शिअल टूरला निघाला, कीं गांवोगांवचे आणि शहरोशहरचे लोकांचे थवेच्या थवे जमून आपल्याला सामोरे पुढें यायचे!

भा:—अशा कांहीं चुका आपल्या हातून होतात खऱ्या!

बा:—ह्या चुका नवेत–परंतु हा आपला शहाणपणाचा तोरा! हा तोरा कृष्णाजीनें ह्मणा, कीं कुणि तरी उतरलान–ह्मणून आपण या टूरला तरी निघालेत! नाहीं तर आपल्यासारखें पोपट, उन लागेल, कांटा मोडेल, वेळ नाहीं–अशींच सोंगें करून आपल्या खुरड्यांत बसायचे!

भा:—खरेंच बुवा! ती कृष्णाजी नव्हे–परंतु मी ह्मणतों कुणि प्रत्यक्ष देवीच आमचे डोळे उघडायला आली!

बा:—हा एक पहिला देखावा शहरच्या लोकांचा दृष्टीस पडून पहिल्या वागणुकीच्या संबंधानें हा आपल्याला पहिला धडाच मिळाला ह्मणायचा! येथपर्यंतचा आपला प्रवास आगगाडीचा व जागजागीच्या रिफ्रेशमेंटरूमचा झाला–परंतु खरा प्रवास तो आतां सुरू व्हायचाच आहे.

पण काय हो, बोलण्याच्या नादांत मला वाटतें आपण तीन चार कोसांची मजल मारली !

भाः—(घड्याळ काढून पहातो.) ओ—साडे-सात झाले ! आपण पांच वाजतां निघालों होतों !

वाः—हें एक गांवच आलें आहे मला वाटतें—आणि इतक्या लांब आल्यासारखा हा गांव आपण आंतून पाहून येऊं.

भाः—ठीक आहे. जायचें गांवांत. (जातात.) ( कांहीं शेतकरी एके ठिकाणीं जमतात. )

जा—या तुमी गेनवा.

गेः—रामराम जानवा.

जाः—कशाचा राव रामराम करतान् हये काय !

ग्याः—इचवन ! अन् तुमी कोन हयेती ?

जाः—अर कशाच ग्यानवा हामीन तुमी ! त्या येसकरान अक्शी जनू धोपटशा लावलानन्.

ग्याः—धोपटशा ! कशा पाईर जानवा ?

जाः—अर मरदा कशापाईर काय इचारतोय् ? पट्टीपाइन ह्मन् !

ग्याः—अर जानवा, पट्टीपाइन माझी गुरन नांगूर अन चटसार कारकुनान काल गुंडाळूनशानी न्येल ! वायकू न पोर अक्शी कालच्या धरून उर बडिवत्याती !

जाः—अर मरदा तुझी दोन ढोर हयेती ह्मनूनशा पट्टीपाई कारकुनान न्येलीं ! ह्मप काय हये ! ना गुर ना ढोर ! घे ह्मनाव नांगूरन

काय !

ह्मा:—( त्रासानें येतो.) या पाटलान त लई इचवन मुंगा लावलाया !

ये:—( काहावून. ) सावकारबी इचवन पट्टीवाराला पैसा घेत न्हाइ ! [ इतक्यांत वेस्कर येतो ]

वे:—जोहार जी.

जा:—कार येसकर, कशापाई हथं आलार तू ?

वे:—अन पाटलान चावडीवर बोहिल हये.

जा:—जा सांग, कीं शातामंदीं ग्यालती ह्मून.

वे:—काय राव शातामंदीं ग्यालती ह्मून सांग ! अक्शी जनू ख्यटर फेकूनशीच पाटील मारिल ह्मूनन.

जा:—जा त न्हाई येत ह्मूनशी सांग.

वे:—न्हाई येत ! अन् ह्यो कस वो राव ? मामुलदाराचा हुकूम हयेनी.

जा:—जा त यऊं ह्मून सांग.

वे:—कंदी ?

जा:—उंद्या !

वे:—मायबाप मी बगा हात जोडतूया—दंडवत घालतूया—पदर पसरतूया—चावडीवरशी चला ! [ इतक्यांत मारवाडी येतो. ]

घे:—[ कानोसा घेऊन आपल्यासी ] इत संमदा मिळूनशी वार्ता करीत बेसले हे. ते मे-

ला पेएल तो भागून जायेल. ये लोकला रोज मे बोलावतें, एंच्या हातापाया पडतें, एंच्याशी गोडगोड वार्ता करतें, एला आणखी रुप्या देल ह्मणून शांगतें–ए काय एंच्या मे गुन्हा करतें! पण लुच्चे शाला लोक–माझ्या करज घेतलेला रुप्या आणून देते नई! आतां ए जो माझ्या रुप्या नई देएल, तो मे एंच्यावर खचित फरयादी करेल. ए लोक मेला काय बोलते–एंच्या जिमीन गाण ठेव अने करज रुप्या दे! आतां एंच्या जिमिन मे गाण केशाला ठेवेल–जिमिनवर तो फरयादी आतां चालते नाई! ए लोकला जिमिनीवर आतां रुप्या देएल अने मे बुडेल–ए चांगला शावकारी! आतां ए गांवमंदीं मे दुकान केशाला ठेवते!

ग्यां:—( मारवाड्याला पाहून ) जानवा, अर ह्मादवा–अर गड्या पळा हथूनशा आतां. ह्यो वर बगा घेलचप्पा मारवाडी तगाद्यास नि आलाया दिसतूया!

जा:—ह्यो मारवाडी जनू आपला अक्शी मायबाप हये–पन बगाया इचवन जिमिनीचा कायदा झाल्यापुन अक्शी बगा रुपयाला हा दरोड्यांत उभा बी करीत न्हाई!

ये:—अक्शी बगा मुंडी त्येच्या पायांवर ठेवूनशी खळाळा म्या रडलों, अन ह्मटल पगा शेटजी, हीं पोर तुमची हयेती–अक्शी पगा उपाशी मरत्यात, तवा माझी जिमीन, नांगूर अन

बैल घाण ठेवा, अन चावडीभरायला रुपये द्या—अन ध्वाडशी दया करून या पोरांच्या पोटा पाण्याला द्या—

ह्मा:——अर आतां त्यो कशाचा रुपये देतोय ह्मना—हकडून चावडीच्या रुपयांकरतां पाटील बी ऐकत न्हाई, तकडून सावकार बी पैसा देत न्हाई! अक्शी पन आतां आपल्या पोरांचीं उपाशी मरन्याची पाळी हये गड्यो!

ग्या:——अर संमद खरय प तो आतां हत आला त ह्मवर त्येला काय सांगाचं!

जा:——चला या हथूनशी आपून जाऊं कुठं दुसरीकड—( उठू लागतात. वेसकर चावडीवर जातो. )

घे:——[ जाऊं लागतात असें पाहून. ] ए ए आमच्या दादा—ए ए आमच्या बाबा—आतां तमे केशाला भागून जाते? हमे तो तुमाला आतां देखाडला. हातां तमे भागून काय गामच्या बाहेर जाएल? कायरे ह्मेदू—तुला मे काय शांगितला? एच कीं नई—

ह्मा:——घरांत बायकू—पोरं भाकरीपाई जनू अक्शी धडाडा उर बडवीत सुटल्याती—चावडी भरायला पैका मिळत न्हाई! अन मावाप सावकार तुह्माला कुठुनशान देऊं!

घे:——ह्मेदू तू आतां इमानशी बोल, तुला काय मे बोलतें, कीं तू पेहला संमदा रुपयाची फेड आगाऊ कर—ते मग में तुला कार्तिक म-

हिन्यांत लागेल तितका तुला रुपये देल ! एसा बोलले कीं नेई ?

झाः--अहो सावकारशेटजी, तुमी संमद खर बोलल्या-मी कुठ प ना झनतोया, अन अक्शी जरा माझ्या बायका पोराकडे पघा-कालच्या धरून पोटाला चिमटा घेऊनशी हयेती !

घेः--मे समजतें-तू फरयादी मांडलें व-गर पैसा देते नई-हामी तुला पेसा दिला ते चोरी केला नाई !

झाः--झन बाबा काई बी ! धन्या पुढं काय बोलावं !

घेः--झेद् तुझा समजला-बरं येसू तू काय बोलते ?

येः--पैसा द्यायचा. सावकाराच्या नर्कात कुणि जाव !

घेः--कवां द्यायचा ?

येः--मिळाल्यावर.

घेः--तुला रुप्या कंदी मिळेल ?

येः--आवंदाच्या वर्सातून जगलू वाचलू या, अन झऊरच्या सालीं मोप पीक पाणी आ-लया त अक्शी जनू चनाचंन रुपये आनून मोजीन.

घेः--तू एसा कर, तू झेदूवाणी नाहीं-व्या-जाचा सगळा हिसाब · चुकता कर, अने नवा रोखा करून दे.

येः--खायला घरांत दाणें न्हाईत झून तर आमी उपाशीं मरतो या ! शेटजी तुमी

असं करा. याजाचा अन मुद्लाचा i करा, अन वरती आमाला एक दोन इसा, न्न एक धा रुपये द्या—अन संमद नव खत करूनशीं जिमिन, गुर, ढोर लावूनशीं घ्या.

घे:—एसू तुला मे खरा शांगतें—तुझा नेत बिघडत चालला! छेदू वाणी तू होऊं नको. तू मध्यान रात्रीं येत होते कीं नई रुपया मागा ला! तुला कोणच्या दिवस मे ने बोलला हे! तुझ्या जिमिन घेऊन मे काय करेल! ए तो तू मेला डुबवायचा घाट चांगला करते! ए ग्यानबा, तू कवां माझ्या रुपिया देते? का एं-च्या सारखाच बोलते?

ग्या:—आतां आमच्याजवळ रुपये त न्हा-ईत—प आमाला इकून टिकून काई वसूल झा-ला त करा न काय!

घे:—ग्येनबा, तुला तर मे ए संमद्यामदीं शाळसूद माणस समजतें ते! तुझ्यावर फर-यादी मांडेल वगर माझा पेसा नई मिळेल! तू जानबा कवां देल? (इतक्यांत पाटील कू-ळकर्णी आणि येस्कर येतात.)

ना:—ह्ये बगा पाटील—कुळकर्णी आमच डोक थापटाया आलती, अन दोन थापट्या तुमी बी मारून जान काय?

वे:—ह्ये पवा संमदे एक जुटून हत बस-ल्याती.

पा:—जानबा, ग्येनबा, ह्मादबा, अन त्यो

कोनर ?

वेः---एसवा दादा.

पाः---एसवा व्हयर–अर एसवा, तुज्या मनांत तरी काय हयेर? कालच्यापून तुझी गुर ढोर अन नांगूर कारकुनान धरलाय, तरी वी तू चावडी आनूनशी भरीत न्हाईस नार? चला संमदे तुमी चावडीवरन.

घेः---पटेल ए लोक मेला ठार बुडवायचा इचार करते हे.

कुः---सरकारची चावडी गोळा होईना, आणि ह्मणें हे लोक या घेलचप्पाला बुडवायचा विचार करताहेत ?

भाः---बाळासाहेब, शेतकरी लोकांची खरोखरी दैना झाली आहे, यांत कांहीं संशय नाहीं. सरकारचा जमिनीवरचा सारा भरण्याची त्यांना ऐपत असूं नये, ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे ! आजपर्यंत अशा गोष्टी आपण एका कानानें ऐकून, दुसऱ्यानें लगेच सोडून देत होतों---परंतु त्या गोष्टींपैकीं पहिला नमूना हा आपण पहाला.

बाः---ह्याच शेतकरी लोकांना जर आपल्याला मिळालें आहे तसें एजुकेशन ( शिक्षण ) मिळालें असतें, तर या लोकांना सरकारचा जमिनीचा धारा भागिवण्यापुरती ऐपत नाहींसी होण्याला जीं कारणें झालीं, त्यांचा तेच विचार करते. परंतु त्यांना एजुकेशन देण्याकडे अजून पर्यंत जसें व्हावें तसें आपल्याकडून परिश्रम

झाले नाहींत—आणि या सर्व गोष्टी सरकारानेंच कराव्या असें आपल्याला वाटतें——किंवा असें ह्मणा, कीं या शेतकरी लोकांबद्दल आपण विचारच करीत नाहीं !

भा:——असें आतां ह्मणण्याला मला तर कांहीं हरकत नाहीं ! मी आतां असें देखील ह्मणतों, कीं ज्या इंग्रज सरकारच्या दयाळूपणानें आपल्याला विद्यामृत पाजलें, त्याचें वास्तविकच आपण कांहीं चिज केलें नाहीं ! आपण आजपर्यंत काय जें केलें—तें स्वोदरभरणा पलिकडे कांहीं एक केलें नाहीं ! शिवशिव धिक्कार असो या आमच्या विद्वत्तेला !

वा:——हं हं भाऊसाहेब हें काय ? 'शिवशिव' हीं देवाच्या नांवाचीं अक्षरें आपल्या तोंडून कशीं आलीं !

भा:——अहो अंत:करण कळवळलें ह्मणजे देवाच्यानांवावांचून जावें कुठें ! आणि अशावेळीं आपलें पूर्वरूपच बाहेर यायचें ! तो आह्मी हृद्यानें प्रार्थनेचा माजिवलेला दंभ काय उपयोगाचा ! त्या ढंगांत जे आह्मी डोळे मिटले—त्या डोळेझांकीचा हा परिणाम—कीं आह्मी स्वत:ला निराश झालों, आणि सर्व लोकांना निराश करीत चाललों !

बा:——असो. ही जी आतां आपण या गांवच्या लोकांची स्थिती पाहिली—तिजवरून आपलें काय बरें अनुमान होतें ?

भाः—प्रत्यक्षच ज्या गोष्टी आपण पहाल्या, त्यांजवर आतां अनुमानें कसलीं करीत बसायचीं—त्यांची ती स्थिती सुधारण्याच्या संबंधानें आपण आतां आपल्या खऱ्या कर्तृत्वशक्तीला चलनच दिलें पाहिजे.

बाः—आपल्या कर्तृत्व शक्तीला आतां चलनच दिलें, तरच या शेतकरी लोकांची स्थिती कांहीं सुधारेल.

भाः—मला वाटतें आपण ज्या कांहीं उड्या मारतों, त्या केवळ या लोकांच्या जीवावर आणि श्रमावर.

बाः—खरेंच, असें ह्मणण्याला कांहीं हरकत नाहीं—कारण प्रस्तुत काळीं ह्मटलें तर काय जें आमच्या देशाचें उत्पन्न, अथवा संपत्ती ह्मटली—तर काय ती येवढ्या शेतीवरच रहाली आहे! आणि या शेतकरी लोकांची आज झालेली स्थिती अशीच का आपण राहूं दिली, तर उद्यां आपणाहि यांच्याच पंक्तीला येऊन बसणार!

भाः—मग ही अशी आपलीहि पण उपास मर व्हायची!

बाः—इतक्या स्थितींत आपण येऊन पोचलों—ह्मणजे ज्यांनीं आपल्याला विद्यामृत पाजिलें, त्यांना मोठी धन्य वाटेल नाहीं?!

भाः—बाळासाहेब, मला वाटतें तुह्मी हे आपलें आह्माला शालजोडीतलें बक्षीस चालिवलें आहेत! त्या कृष्णाजीच्या रूपानें झालें तें बस्स

नाहीं ना अजून तुझाला वाटत ?

बा:—छे छे भाऊसाहेब या वेळेस माझा तसा कांहीं एक हेतु नाहीं–परंतु अंतःकरणांतूनच असे उमाळे फुटूं लागले, त्याला माझा कांहीं इलाज नाहीं. आणि तशांतून जे कांहीं यावेळीं माझ्या तोंडांतून बोल निघताहेत, ते केवळ तुझाला एकट्यालाच टोंचणारे नसून, मलाहि पण–किंबहुना आपल्या वर्गातील सर्व लोकांना सारखे टोंचणारे आहेत !

भा:—बाळासाहेब, या इकडे या पाटीवर पहा काय लिहिलें आहे तें !

बा:—ओ–' मेरि क्लब '

भा:-—' मेरि क्लब ' या खेडेगांवांतून देखिल झाले आहेत तर ? !

बा:—हे आपल्या शहाण्या सुधाऱ्यांचेच प्रभाव आहेत !

भा:—मग आपल्याला आंत पहायला गेलें पाहिजे.

बा:—भाऊसाहेब, त्यांत काय आपल्याला पाहण्या सारखें नवीन असणार? कारण आपण या असल्या ढंगांत पोहलेले आहोत !

भा:—तरी पण जायचेंच आंत.

बा: —मग त्या मंडळींत तरी नको–आपले एकिकडूनच मजा पाहूं.

भा:—तसें करूं–पण हा प्रकार पाहिला पाहिजे खरा–

( मेरिक्लबची मंडळी. )

गुलछन:---पण काय हो वेरिव्रहार—त्या दिवसासारखी गम्मत फार दिवसांत उडाली नाहीं बुवा !

वेरिव्रहार:---तशा गमती आपल्या क्लबांत न होतील, तर आपल्या क्लबचें ‘ मेरिक्लब ’ हें नांव बदललें पाहिजे ! आपल्याला तर बुवा गमती वाचून चैनच पडत नाहीं !

वडालाल:---आपण आज गम्मत करूं या तर—

छोटालाल:---आज तर बुवा गम्मत झालीच पाहिजे !

गु:---आपण तर बुवा दिवसांतून एक वेळ तरी गम्मत केल्यावाचून रहात नाहीं—आपल्याला चैनच पडत नाहीं !

वे:—एकदां काय आणि दहादा काय—बाटलीची आणि आमची गांठ पडली, कीं मग बाटली आहे आणि आह्मी आहोत ! परवांच रात्रीं जवळ कांहीं पैसे नव्हते—उसने कांहीं कुणि देईनात, तेव्हां मग मागें पुढें कांहीं पहालें का ? परंतु २९ रुपयांचें पागोटें-झटलें आठ आण्यांना का होईना, तलफ भागते आहे, तर टाकावें विकून—आणि हूं काय ? टाकलें विकूनन आणि गम्मत केली ! बस्स बुवा ती गम्मत खरी !

गु:—एकून रंगीरंग उडवून दिलात तर !

व:——रंग ह्मणजे काय ह्मणतां–रंगांत रंगच केला !

बे:——असा रंग उडाला पाहिजे–नाहीं तर झोकली आणि पडले–काय त्यांत अर्थ आहे ! ?

गु:——हूं–चलाव गम्मत–गम्मत गम्मत गम्मत की जय–बोलो गम्मत गम्मत की जय !

बा:——हा कीं नाहीं भाऊसाहेब–आपल्या विद्वान लोकांच्या अनुकरणाचा परिणाम ! आपल्या सारखी जाड्यांतली मंडळी असल्या दुर्व्यसनाचा धर्मावर अश्रद्धा करून अंगीकार न करती, तर विलायतेहून एम. पी. मिस्तर केन साहेबाला ४ हजार कोसांवरून आपल्या पवित्र देशांतील पवित्र लोकांत माजलेला सुरापानाचा प्रकार बंद करण्याकरितां पायांचे भाडें देत, आणि आपल्या पदरचा पैसा खर्च करीत कां यावें लागलें असतें ?

भा:——आह्मी आमच्या सनातन धर्माला झुगारून दिल्यानेंच हा अक्काबाईचा फेरा आमच्याकडे वळला ! गृहस्थानें–ह्मणतो आपली दारूची तलफ भागिवण्या करतां २९ रुपयांचें पागोटें आठ आण्याला विकलें !

बा:——पागोटें विकल्यावरचा हा आजचा तडाका आहे !

भा:——' प्रेजुडिस 'च्या संबंधानें ही वेळ पर्यंत आमची कांहीं निराळ्या प्रकारची समजूत होती. आह्मी आमचा स्वत:चा फायदा करून

घेण्या करतां आह्माला 'प्रेजुडिस' नाहीं असें परकियांजवळ वरकांतीं बोलून प्रसंगोपात त्यांच्या जवळ चोरून मारून तसें वर्तनहि करीत होतों. आणि घरांतून केव्हां केव्हां असें, आणि केव्हां केव्हां तसें, असें प्रसंग पाहून वर्तन करीत असतो त्याचा तर हा परिणाम नसेल ? !

वा:—ही एक विचार करण्यासारखी गोष्ट आहे ! आणि ती तुमची तुह्मालाच कळली हें त्यांत फार चांगलें झालें ! आणखी दुसरी कांहीं विद्यामदांध मंडळी आहे, आणि ती केवळ अविचारानें धार्मिकत्वाच्या ढंगावर प्रत्येक गोष्टीला वडबड ह्मणून ह्मणणारी आहे !

भा:—धर्मकृत्यांतील गोष्टींना व्यर्थ वडबड ह्मणून ह्मणणारी आहे ! ? आणि अशी मंडळी असेल तर ती मी ह्मणतों, कीं आमच्याहि पेक्षां अति निंद्य मानली पाहिजे ! कारण आह्मी बोलून चालून अधर्म स्वीकारून दुसऱ्याला अधर्माचें वळण लावतो, आणि हे लोक धर्मानें लोकांना अधर्मी करतात !

वा:—अहो बोलतां बोलतां मला वाटतें आपण रानाची वाट धरली ! आज कांहीं आपल्याला जेवणखाण कांहीं नाहीं वाटतें !

भा:—केव्हांसें मला वाटतें आपण बोलला होता, कीं देशसेवेचें वारें असेंच आहे ! मात्र खरें भरलें पाहिजे, ह्मणजे भूक नाहीं, तहान नाहीं, आणि श्रम नाहींत ! अशी स्थिती होऊन जाते !

बा:—मला वाटतें देशसेवेच्या वाऱ्याचा संचार आपल्या शरिरांतील प्रत्येक स्नायूमध्यें खेळूं लागला !

भा:—पण काय हो हे लोक कोण दिसताहेत ?

बा:—पाहूं आतां कोण आहेत ते.

( अनाथ लोकांपैकीं एकजण देवाजवळ बोलतो. )

हतून तथ, नि तथून पळयाड—पघ जमिनकी नांगरून पेर. अन जा रानांत, तोड लाकूड की वे भारा डोईवर, अन जा बाजारांत—अन अस करून पोट जाळायच. तवी तू वंद केल आं ! अर तू आमचा देव ना ? अन अस तू आमाला उपासी मारतो र ! अन तू काय दगुडाचानी दगुडच होऊन बसलार ! आतां हीं पोर भुकेपाई मला तोडतोडून खातील नार. अर देवा तुला आमची गरिबांची काकुळत न्हाईनार येत ! अरे भल्या—ना घर, ना दार, ना हांत्रुण, ना कांवरुण, ना धान्य, ना पैसा, अस चवूनशीवी निसतोस नार ! ( खायला खायला असें करीत आणखी कांहीं ओरडतात. )

भा:—हे लोक कोण आहेत ? त्यांची ही स्थिती पाहून मला कांहीं ओळखू येत नाहींत.

बा: —हे कुणी अन्नवस्त्राच्छादन रहित असलेले लोक मला दिसतात.

भा:—अन्नवस्त्राच्छादन रहित ? ही या लोकांची भयंकर स्थिती माझ्यानें पहावत नाहीं,

भा:—चला तर परत फिरू आतां.

भा:—परत ! ( घेरी येऊन पडतो. त्याला कांहीं वेळानें सावध करून बाळासाहेब मुंबईस नेतो. )

---

## प्रवेश ९ वा.

### स्थल:--मैदान.

पात्रें:--स्त्री ( अंत:करणांत पश्चात्तापानें दग्ध झालेली वैरागिणीच्या वेषांत बरोबर मुलगी व कुत्रें यासह प्रवेश करते.) भाऊसाहेब–बाळासाहेब–व दुसरे लोक.

स्त्री:—आतां हवा तितका मी पश्चात्ताप केला–खंडोगणती रडून रडून डोळे सुजिवले–कृतकर्मांचा वारंवार उच्चार करून मीच आपल्याला वेडी ह्मणवूं लागलें–अखेर मनाच्या उद्वेगानं कपाळहि फोडून घेतलं–तरी त्यापासून काय होणार? ! एका अधर्मप्रवृत्तीनं मी आपल्या सर्वस्वाला मुकलें ती मुकलेंच–परंतु माझ्या मोहजाळांत सापडून धर्माच्या ढंगानं धर्मांध बनलेल्या लोकांनीं फसूं नये, अशा कांहीं ढंगाचं मी वर्तन ठेवूं लागलें, तरी पहातें–तों ते आपले माझा छबिना मिरवण्यास तयारच ! पूर्वाश्रमांत लहानपणींच मी बुद्धीची थोडी तीव्र असल्यानं माझ्या आईबापास माझं मोठं कौतुक वाटे, नि तीं उभयतां मोठी धार्मिक असल्यानं त्यांचाच चांगला मोठा मला लागावा, ह्मणून त्यांनीं मला

गुरूपदेश देऊन मजकडून सुविद्येचा संस्कार करविला. पण काय बाई ! माझ्या अल्पवयांतच तीं उभयतां स्वर्गस्थ झाल्यानं वरती आकाश नि खालीं पाताळ—यावांचून किलेक दिवस दुसरं मला कांहींच दिसेना ! नि अशा स्थितींत राहूकेतूवत ग्रासणाऱ्या कित्येक कली पुरुषांनीं माझ्या भोंवतीं मंडळ घातलं ! या पूर्वी माझ्या मनांत तपस्विनी व्हावं असा माझा निश्चय ठरला होता, नि त्या निश्चयाप्रमाणं मी तपस्विनी झालें असतें, तर आजला माझ्या कडकाडित ब्रह्मचर्यव्रतानं मी ईश्वरप्राप्ती करून घेऊन मोक्षाला योग्य झालें असतें ! परंतु या राहूकेतूरूपी कलीपुरूषांचं जें माझ्या भोंवती खळं पडलं, त्याच खळ्यांत मी गुंतल्यानं, मीहि खळ होऊन तोंडाला येईल तसं वहकूं लागलें ! नि त्या योगानं मोक्षाच्या सामुग्रीचा नाश होऊन त्याच्या उलट सामुग्रीची मात्र भरपूर तयारी होत चालली ! त्या योगानं मी साक्षात 'पापमूर्ती' बनल्यानं माझं अत्यंत उग्र तेज त्यांना सहन होईनासं होऊं लागून, मज भोंवतालचं त्यांचं पडलेलं मंडळ मजपासून दूर दूर होऊं लागलं ! अर्थात अशा वेळीं मला अगदींच निराळा पंथ स्वीकारावा लागला ! कां हो नाहीं लागणार ? ! मी तुमच्या मताप्रमाणं आतांच जातींची उत्सृंखळ बायको झालें का ? ! नि समजा मी अंगचीच उत्सृंखळ बायको असतें—तरी मा-

ह्या आईबापांनीं मला जें विद्याधन दिलं होतं, त्याचा विनियोग कसा करावा, हें वेळींच त्यांनीं मला चांगल्या रीतीनं शिकविलं असल्यानं, तुह्मां कळी पुरुषांची मजबरोबर गांठ न पडती, तर एका प्रकारची तपस्विनी—व्यवहारांत सदाचार संपन्न—स्त्रीजातींत विनय व चतुरस्रपणांत मुकुटमणी अशा प्रकारचं एक अमोल स्त्रीरत्न बनून रहातें ना का?! पण करायचं काय आतां? तुमच्या खळ संगतीचा हा माझ्यावर असला भयंकर परिणाम झाला ना! याचीं फळं मला तर भोगलींच पाहिजेत! परंतु भोगा आतां तुह्मीच! तुमच्या कृतीचं तुह्माला उलट वाण बरोबर रीतीनं न देईन, तर ही स्त्री मी कशाची?! आह्मी स्त्रिया बोलून चालून अविचारीच, नि त्या अविचाराच्या तडाक्यांत तुह्मी आहात आतां.

मु:—काकू आतां घरीं नाहीं काग यायचं? माझे गडे पाय दुखूं लागले. जा मी नाहीं आतां पुढें यायची.

स्त्री:—बाळे—खरंच तुझे पाय दुखूं लागले असतील! आतां तुला बाजारांत मी थोडासा खाऊ देईन, नि घरींच जाऊ वरं. (आपल्याशींच) या पोरीकडे पाहून माझ्या पोटांतील आतड्यांना जो पिळ बसतो आहे, त्यानं माझ्या अंगांतील रक्ताचं शोषणच होऊं लागतं! वाटतं ही पोरटी माझ्या सारखीच अवला, हिनं काय वरं माझा गुन्हा केला आहे? (उसासा टाकते.)

मु:—काकू तू काग अशी रडतेस? चलनास घरीं, मला नको तो बाजारांतला खाऊ अशानं.

स्त्री:—( कुरवाळून ) बाळे—मी कांहीं रडत नाहीं.

मु:—मग काय तर हे असे डोळे पुसते आहेस?

स्त्री:—तूं मोठी लबाड आहेसग! अग माझ्या डोळ्यांत वाऱ्यानं केर उडाला, ह्मणून मी डोळे पुसतें आहे.

मु:—मी फुंकरूं का तुझ्या डोळ्यांत?

स्त्री:—किती तरी या मुलीचं शहाणपण आहे हें? बाळे! तुझ्या फुंकरण्यानं कीं नाहीं, माझ्या डोळ्यांतला केर बाहेर निघायचा नाहीं! माझे डोळेच असे वाईट झाले आहेत!

मु:—कशानग तुझे डोळे वाईट झाले?

स्त्री—( आपल्याशींच. ) काय वरं आतां इला कारण मी सांगूं? संसारसुखानुभव इला होऊं नये, अशा प्रकारचं इला मी शिक्षण देणार आहे हें सांगूं का? अर्थात ज्या स्थितींत या काली पुरुषांनीं मला आणून सोडलें, त्याच स्थितींत, किंबहुना त्याहि पेक्षां भयंकर स्थितींत मी यांना नेउन सोडणार, नि तें शिक्षण ह्मणून देऊन! पण चमत्कार असा, कीं—मी धडधडीत धर्म द्रोही होऊन तृतीय पंथ स्विकारला आहे, तर माझं वर्तन माझ्या बोलण्या प्रमाणं कधींहि होणार नाहीं—असे यांच्या अकलेनं यांना कळूंच का

नये ? किंवा कळूनहि जर आपल्या पोरी हे माझ्या दिमतींत अशा प्रकारानं आणून सोडतील, तर त्याचीं फळं ते भोगतील! एकंदर स्त्रीजाती विषयीं जरी माझं अंतःकरण कळकळत असलं, तरी अनेक कारणांनीं मला जें आतां मायारूप धारण करावं लागलं आहे, तें सोडतां येत नाहीं! तेव्हां माझं अंतःकरण त्यांच्याविषयीं कळवळून नि नकळवळून सारखंच! (भांबावते) का कोणीच का नाहीं माझ्या प्रश्नाचं उत्तर देत! अहो—हो हो तरी ह्मणा ! नाहीं तर टाळ्या तरी वाजवा ! अशीं उत्तेजक चिन्हं तुमच्या कडून न होतील, तर माझ्या व्याख्यानाचा प्रभाव झपाट्यानं चालिवण्यास मला धैर्य तरी कसं येईल ? ( ऐकलेंसें-करून. ) माझं व्याख्यान ऐकण्या विषयीं तुमचा हा टाळ्यांचा गजररूपी हुरूप पाहून मला बोलायला आतां फारच उमेद आली आहे ! परंतु एक दुःखाची गोष्ट आपल्याला कळिवण्यास मला फार दिलगिरी वाटते !—ती अशी, कीं आपण केलेल्या टाळ्यांच्या गजरानं माझ्या कानटाळ्या बसून गेल्या ! माझ्या व्याख्यान विषयांत विषयांतर हें कधींच होत नाहीं ! आजपर्यंत तुमचे पूर्वज मूर्ख होते इतकंच मी ह्मणत होतें — पण तुह्मांला दिखिल त्यांच्याच पंक्तीला बसवायला मला कांहीं हरकत दिसत नाहीं ! माझ्या पराक्रमाकडे पाहून बोला, ही गोष्ट तुह्मांला पटते कीं नाहीं ! पटली ! खास पटली !! पटायलाच

पाहिजे ! अलंकारशास्त्र मला चांगलं अवगत आहे—ह्मणून मी तुह्मांला तुमच्यांत आवड निवड न करतां सरसकट एकदंतो डुकर ह्मणतें ! बोला आहांत कीं नाहीं ते ? आहांत ! ? तर मग आहांत खरे ! तुमचा धर्म अगदीं वाईट आहे, नि तुमचे धर्मगुरू त्याहिपेक्षां वाईट आहेत! ( हें भाषण बाळासाहेब व भाउसाहेब ऐकत असतां मध्येंच. )

भा:—अहो—पोषाकावरून तर ही वैरागीण दिसते ! बरोबर एका पोरी वांचून दुसरें कुणि नाहीं—आणि तुम्ही एकदंता डुक्कर, आणि तुमचा धर्म आणि तुमचे धर्मगुरू एका पेक्षां एक अधिक वाईट असें आपल्याशींच वडवडते आहे ही कोण ?

बा:—मला वाटतें कदाचित चळावलेली कुणि बायको असेल !

भा:—चळावलेली ! नाहीं तर मला वाटतें हें त्या कृष्णाजी सारखें तर दुसरें कोणि मनुष्य नसेल ना ?

बा:—काय सांगावें बुवा ! तसेंच कुणि दुसरें मनुष्य असेल तर ?

भा:—आपल्याला वाटेल तें, किंवा आपण ह्मणूं तें शास्त्र व्हावें असें जें आपल्याला वाटतें, आणि ह्मणून जी आपण वडबड करीत असतों, तो भाग बंद करण्या करतां हा दुसरा अवतार तर नसेल ना !

बा:—आणखी थोडें ऐकूं काय बोलते ती आणि मग ठरवूं ही कोण आहे ती.

स्त्री:—अहाहा! हा तुमचा टाळ्यांचा गजर पाहून-पाहून ह्मणतें याचं कारण तुह्माला सांगितलंच आहे, कीं माझ्या कानठाळ्या बसल्या आहेत-मला फार आनंद होतो! (अंमळ वेळानें) काय तुह्मी ह्मणतां! मी विषयांतर केलं? छे हो—धर्माची नि तुह्माला शिव्या द्यायची ही बात ज्यांत त्यांत यायचीच!

भा:—बाळासाहेब, ही वेडीच कुणी तरी बायको आहे!

बा:—ही वेडी तर मला दिसत नाहीं, परंतु आपल्यांतील शहाण्या मंडळीनें इला चळिवलेली आहे-ह्मणून तो तिच्या ध्यानींमनीं खिळलेला चळ या ठिकाणीं ती आपल्याशीच बडबडते आहे!

भा:—अशी वेड्या सारखी?

बा:—वेडाच्या पुढची चळाची पायरी ह्मणा न्.

भा:—आतां इच्या जवळ बोललें पाहिजे तर, व्हा इच्या पुढें—आपण बोलणार.

बा:—बराहे बुवा. (तिच्या पुढें जातात.)

भा:—अहो वैरागीणबाई, ही मुलगी कोणाची?

स्त्री:—दमखा हो आधीं, माझं व्याख्यान संपूं द्या.

भा:—तुमचें व्याख्यान ऐकायला श्रोतृमंडळ

तरी कोण आहे ?

स्त्री:—कोण आहे ह्मणजे ? माझा विषय मला पुरा करूं द्या—त्याच्यावर कोणाला बोलायचं असलं तर मला उत्तरं दिलीं पाहिजेत.

बा:—दिसते का खरी चळलेली बायको ?

स्त्री:—हं—तर काय मी सांगत होतें, कीं तुह्मी सगळे मूर्ख आहांत ! नि ते तुह्मी कबूल करतां !—पण काय हो, मी जें हें तुमच्या पुढें व्याख्यान दिलं, तें ऐकायला एकाहि श्रोता मज पुढें दिसत नाहीं ! मग हें मी येवढें थोरलं व्याख्यान दिलं—दिलं तरी तें कोणा पुढें ? मला चळवीळ तर—कांहीं भरला नाहीं !

बा:—भाऊसाहेब, हें खरें रूप प्रगट होऊं लागलें बरें !

स्त्री:—मी काय काय बोलें असेन बरं ? नि त्यांत का मी माझ्या मायावी स्वरूपाचं वर्णन केलेलं—( चकित होऊन ) पण हे दोन गृहस्थ कोण ? ओळखीचे दिसतात—यांनीं ऐकलं असेल, तर ते पत्रांत छापून माझी फजिती फजिती करतील. पण आतां तरी मी शुद्धिवर आलें आहे का ? नाहीं तर कांहीं तरी भलतंच यांच्या जवळ बरळूं लागेन!

भा:—का बाई—हा सा पोषाग धारण केलात ?

स्त्री:— ( मनांत ) यांनीं तर मला ओळखलं. हे भाऊसाहेब, नि दुसरे बाळासाहेब. आतां

यांच्या जवळ लपंडाव करून कांहीं उपयोग नाहीं. सरळ सरळ तरी यांच्याजवळ आपण बोलूं पाहिजे, ह्मणजे चळल्याचा दोष जाईल. हो! पोषाग वैराग्य उत्पन्न झाल्याच्या योगानं केला आहे.

भा:—बाई, आपल्याला वैराग्य उत्पन्न होण्याचें कारण?

स्त्री:—तुमच्या टूरची नि टूरमध्यें असताना लोकस्थिती पाहून घेरी येऊन पडल्याची गोष्ट वर्तमानपत्रांत वाचल्याचं कारण.

भा:—त्या गोष्टीशीं आणि तुमच्या वैराग्याशी संबंध कसा काय जुळतो?

स्त्री:—लोकांना ह्मणायला वडापिंपळाच्या साली सारखा होईल—पण मी माझ्या भगिनींना देणाऱ्या शिक्षणाचा परिणाम कांहीं काळानं घेऱ्या आणून पाडणारा होईल—ती त्यावेळची मुर्तीमंत स्थिती माझ्या नजरे पुढें उभी रहाल्याच्या योगानं तुमच्या गोष्टीशीं नि माझ्या कृतीशीं संबंध जुळतो!

भा:—मग काय आपल्या स्त्रियांचें शिक्षण बंद करायला पाहिजे?

स्त्री:—तुह्मी बंद करूं लागल्यानं स्त्रियांचं शिक्षण बंद होतं असं थोडंच आहे! कारण त्यांना गृहशिक्षणाची संस्था पूर्वापर आहे, ती तुमच्या बंद करण्यानं कांहीं बंद व्हायची नाहीं. तीच चांगली, नि संसारांत स्वार्थाला नि परमार्थाला

योग्य आहे. आमच्या शिक्षणांतील स्त्रिया एका पुरुषाबरोबर सुखासमाधानानं नांदून संसार करून, इहलोकीं सुख नि परलोकीं उत्तम गति, कधींहि पावणार नाहींत. या माझ्या बोलण्यांत काय तुह्मांला समजायचं असेल तें समजा.

बा:—बाई, हें आपलें खरें वैराग्य आहे का?

स्त्री:—या वेळेस तरी आहे—किती वेळ टिकेल तें पहायचं आहे! मी बाह्यात्कारी तुमच्या सारखी नि तुमच्यांतलीच दिसतें, परंतु आजपर्यंत अनान्वित स्वेच्छाचारानं वर्तन केल्यामुळं अंतर्यामीं मी धर्मद्रोह संपादन केला आहे, त्या पापाचा झाडा द्यायला कांहीं दिवस पर्यंत मी एखाद्या पवित्र स्थळीं अशीच आतां जातें—( जाऊं लागते.)

भा:—अहो बाई, आपण कोण, काय वगैरे बद्दल आपलें कांहीं वृत्त आह्मांला कळवा, आणि मग जा—ह्मणजे त्यापासून आह्मांला कांहीं फायदा करून घेण्यासारखा असल्यास त्याचा विचार करूं.

स्त्री:—चलग बाळे, यांच्या नादीं लागून आपलं इतिवृत्त यांना सांगण्यांत कांहीं अर्थ नाहीं. हे शहाणे असतील, तर ता ह्मटल्या बरोबर यांनीं ताकभात असं समजलं पाहिजे! न समजतील, तर त्याचीं फळं ते भोगतील!

हें मन मोठं चंचळ आहे, यानं मोठ्या मोठ्यांना फशिवलं आहे!—ह्मणून याच उपरतीच्या झटक्यासरसी कोणाला न कळत मी एखाद्या क्षेत्रीं एकदां जाऊन पडलें, ह्मणजे मी पुढच्या सुमार्गाला तरी लागेन. ह्मणून या मला 'जागती देवी,' बनिवणाऱ्या खंडोबांच्या संगतीचा मोहच तोडला पाहिजे—नि ह्मणूनच तुमच्या जवळ माझं इतिवृत्त न सांगतां, ही पहा मी अशीच गेलें. (जाते.)

भा:—काहो बाळासाहेब, ही 'जागती देवी' कोण बुवा?

बा:—जी बाई नाहींशी झाल्याचा बोभाटा होईल तीच मग आपण समजूं.

भा:—उत्तरें ह्मणजे तुमच्या जवळ जशी कांहीं रेखून ठेवलेलीं!

बा:—असो ह्मणा. पण राष्ट्रीय-सभेच्या संबंधानें आपली कांहीं कामगिरी बजावण्या सारखी असल्यास आपण तयार आहोंत.

भा:—अहो आपणच काय-परंतु आपल्या सारखी आणखी पुष्कळ मंडळी (स्त्री पुरुष येतात.)

सर्वजण:—हो हो—आह्मी देखील आमच्या हातून होण्या सारखी कामगिरी बजावण्यास तयार आहोंत—परंतु तुमच्या धुरीण मंडळीनें आह्मांला हाताशीं धरून आमच्यावर विश्वास ठेवून आह्मांला कामगिरी सांगितली पाहिजे!

भाः——ऐका-पुढें जें कांहीं मी बोलणार होतों, त्याच शब्दांचा या मंडळीनें स्वसंतोषानें गजर केला! याजवरून राष्ट्रीयकाम करण्याची आपल्या देशबांधवांना किती हौस आहे, याचा विचार करा!

सर्वजणः——राष्ट्रीयकामें करण्याची आह्मांला हौस पुष्कळ आहे, परंतु ती आमची पुर्ण कशी होणार?

भाः——देशबांधवहो—असे घाबरे व उतावळे होऊं नका. राष्ट्रीयकाम करण्याला अनेक मनुष्यांचा संघ होऊन, त्यांच्या विचारांचा पाहिल्यानें चांगला खल व्हावा लागतो. ह्या अनेक धुरीण मनुष्यांत सर्वच उदार मताचे, सर्वच स्वहित त्याग करणारे, सर्वच चलाख, सर्वच निस्पृह, सर्वच निर्लोभी असे असतात असें नाहीं. राष्ट्रीयविचाराच्या संबंधानें आपण जी आतां एक प्रकारची प्रहसनरूपानें कामगिरी बजावीत आहोंत, त्यांत ज्या प्रतीच्या पात्रांची योजना केली आहे, तशापैकीं एकाददुसरा त्यांत कोणि आपल्याला आढळत असल्यास, तेवढ्यावरून आपल्याला निराश व्हायला नको! आणि मला तर असें वाटतें, कीं आपल्या प्रहसनांत ज्या मासलेदार पात्रांची योजना केली आहे—तीं केवळ प्रहसनाला गोडी आणून हांशा पिकिवण्यांत राष्ट्रीयविचार लोकांच्या मनांत जागृत करण्या पुरतीच आहे.

सर्वजनः——तर मग एकादी टॉलेजंग सभा भरवा तर.

भाः——राष्ट्रीयसभेची 'म्यानेजिंग कमिटी' बहुधा याच विचारांत असेल—आणि आपणा सर्वांची अशा प्रकारची त्यांना उत्कट इच्छा दिसल्या बरोबर ती एकादा दिवस नेमण्याच्याच तयारीला लागेल !

सर्वजनः——आपण ग्ल्याडस्टोनिअनटूरमध्यें काय केलेत ?

बाः——तें मीच सांगतों आधीं. हे घेरी येऊन पडले ! आणि यांना शुद्धीवर आणून येथपर्यंत आणी तों माझ्या कांहीं जीवांत जीव राहाला नव्हता !

भाः—टूरमध्यें ज्या गोष्टी आह्मीं पहाल्या; त्या गोष्टींचा प्रत्यक्ष देखावा आमच्या बरोबर आपल्याहि पुढें साचंत होताच. त्याजवरून सार्वजनिक कामें करण्याकरतां लोकांच्या अंगीं असणारा हुरूप तरतरीत करण्याला काय केलें पाहिजे, शेतकरी व सावकार लोकांची उदास झालेली स्थिती सुधारण्या करितां कोण कोणते इलाज केले पाहिजेत—आपण आपल्या अंगावर घेऊन शेतकरी लोकांना कोणत्या प्रकारचें विद्यादान दिलें पाहिजे, त्यांची शेतकी सुधारण्याच्यासंबंधानें अवश्य लागणाऱ्या गुरांची कोणत्या प्रकारानें जोगवण केली पाहिजे, गायरानांची कोणत्या प्रकारानें सरकार पासून मोकळिक क-

रून दिली पाहिजे; शेतांतील राबाला अवश्य लागणाऱ्या झाडझाडोऱ्याची सरकारी रानांतून सरकार मार्फत कशी व्यवस्था केली पाहिजे, गुरांच्या उपयोगा करतां लागणाऱ्या मिठावरील कर कोणत्या शर्तीनीं सरकाराजवळून माफ करविला पाहिजे, सुरापानाच्या झालेल्या प्रसाराचा मोड कसा केला पाहिजे, व अनाथ जीवनार्थ सरकाराला कोणती शक्कल अगर युक्ति सुचविली पाहिजे,—वैगेर गोष्टींचे विचार आपल्याला सर्व कामें एकिकडे सारून केले पाहिजेत, ह्या गोष्टी आम्ही आपल्या टूरमध्यें आपल्या नजरेस आणल्या आहेत.

सर्वजणः—गोमाते विषयीं तर श्रीमान स्वामींनीं खटपट चालिवली आहेच !

भाः—बोला श्रीमान स्वामी की जय—राष्ट्रीय हिताच्या कामाला श्रीमानस्वामी सारखीच सात्विक वृत्ति धारण केली पाहिजे. श्रीमान स्वामींचे गोमाता संरक्षणाच्या संबंधानें विचार आपले लोकप्रिय झालेले गव्हरनर अथवा—इलाखाधिपति लॉर्ड रे, यांनीं ऐकून, आपल्या हातून होईल तितकी मदत करण्याविषयीं उद्गार प्रदर्शित केल्याबद्दल—बोला लार्ड रे साहेब की जय—

भाः—आपला प्रहसन प्रयोग आटपला—तेव्हां बादशाहीण व्हिक्टोरियाचे अमलांत आपण सुखानें नांदतों आहों—बोला ३ वेळां बादशाहीण व्हिक्टोरिआ की जय—

बा:—राष्ट्रीयसभेचे जनरल सेक्रेटरी मि. ह्युम —बोला मि. ह्युम साहेब की जय—

भा:—राष्ट्रीयसभा की जय——ज्या सच्चिदानंद प्रभूच्या यशानें राष्ट्रिय कार्मी मोठ्या झपाट्यानें, थाटानें, व स्वामीभक्तिनें तन—मन—धन, खर्ची घालण्यास आम्हांस स्फूर्ती दिली—बोला त्रिवार त्या प्रभूचा जयजयकार असो.

श्रीकृष्णार्पणमस्तु.

# जाहिराती.

## FOR SALE.

| | Rs. | a. |
|---|---|---|
| Pandurang Hari... ... | ...1 | 4 |
| The Bombay Dancing Girls | ...1 | 0 |
| The Bombay Beggars and Criers | 1 | 0 |
| Glossary of Children's Treasury | 0 | 10 |
| The Island of Angediva | ...0 | 8 |
| Key & Catechism to Brief History of England ... | ...0 | 6 |
| The Enchanted Fruit ... | ...0 | 4 |
| Versification of the Deserted Village in Marathi ... | ...0 | 4 |
| The Economy of Human Life, in 2 parts, price per part | ...0 | 4 |
| The Governors of Bombay | ...0 | 4 |
| Book of Fate (with 80 Pictures ) | 0 | 4 |
| Liquor Drinking in India | ...0 | 2 |
| Fortune Teller (with 75 Pict) | ...0 | 2 |
| Marathi Schools & School Mastr | 0 | 2 |
| Pleasure Parties in India | ...0 | 2 |
| Palmistry, Chirognomancy and other Prognostics ... | ...0 | 2 |
| Flesh-eating in Ancient India | ...0 | 1 |
| Hand book of Practical Correspn | 0 | ½ |
| Brahmanical Institution of Caste | 0 | 3 |
| The Woman's Right, or how my neighbour lost her only child | 0 | 3 |
| Omens from the falling of house lizards, to which are added lucky and unlucky week days.. | ...0 | 2 |
| Shukshma Dnyan ... | ...0 | 2 |
| The Hindu Clerks ... | ...0 | 2 |

## विक्रीस तयार.

| | रु० | आ० | पै |
|---|---|---|---|
| रावबाजीचें पलायन आणि पेशवाईचा अंत | १ | २ | ० |

| | | | |
|---|---|---|---|
| भार्याप्रमाद अथवा पतिविटंबन नाटक | ० | ६ | ० |
| आगमप्रकाश.... .... .... | २ | ० | ० |
| वीरपत्नी ( रेनोल्डस् सोलजर्स वाईफ ) | १ | ० | ० |
| बजेश्वरी, ( रेनोल्डस् सीम्सस्ट्रेस ) | ० | ८ | ० |
| गजराबाई किंवा हरिद्वार मल्लिका .... | ० | ४ | ० |
| गंगालहरी ( टीकेसहीत ).... .... | ० | ४ | ० |
| श्री पांडुरंगांच्या काकड व शेजारत्या, मौंजी, विवाह अष्टकें इ० .... | ० | ३ | ० |
| अग्निक्रीडाचमत्कार (दारु कांमाचें पुस्तक) | २ | ० | |
| आर्यनीतिसुधा ( भगवद्गीतेंतील वेचें ) | ० | १ | ० |
| स्त्रीगीतमाला. भाग १. .... | ० | १ | ० |
| पंढरीचा विठोबा ( पद ).... .... | ० | १ | ० |
| साध्वी स्त्री .... .... .... | ० | ० | ६ |
| अक्कलकोटच्या स्वामींचें चरित्र भाग २रा इतिहासरूपानें---अद्भुत चमत्कार .... | ० | ८ | ० |
| संगीत वामनचरित्र. .... .... | ० | ६ | ० |
| भाषासुंदरी अथवा विष्णु कृष्ण चिपळुणकर यांचे नाट्यावतरण .... .... | ० | ४ | ० |
| सरस्वतीमंडलाच्या स्वरूपाचें निरूपण | ० | ४ | ० |
| सासुरवास परिणामदर्शन प्रहसन.... | ० | ४ | ० |
| हुंडा प्रहसन .... .... | ० | ४ | ० |
| फ्याशनेबल वाइफ प्रहसन .... .... | ० | ३ | ० |
| स्त्रीविद्यावैचित्रदर्शन प्रहसन.... .... | ० | ३ | ० |
| फरडा मुत्सद्दी प्रहसन.... .... | ० | ३ | ० |
| सद्ध्याचें तट अथवा आमच्यातील ठळक भेद | २ | ० | |
| बशासतसें पुरवणी .... .... | ० | १ | ० |

सद्यःस्थीतीचा रंग अथवा प्रहसन पुस्तकां-
वरील वावटळ .... ....० १ ६

**दानत**— भाग पहिला, स्माइल्स साहेबांच्या 'कलेक्टर' या पुस्तकावरून हिंदु युनियन क्लबच्या एका सभासदानें तयार केली. किं. १॥ आणा.

**सद्गुणी स्त्री**—वऱ्हाडांतील "ज्ञानसंग्रह" मासिक पुस्तकांत कै० बजाबा रामचंद्र प्रधान यांणीं लिहिलेली गोष्ट. किं. ४ आणे.

**गीतार्थसार**—रावसाहेब वामन आबाजी मोडक यांणीं लिहिलें. किं. ४ आणे.

**ठगाची जबानी-पूर्वार्ध**—मेडोज टेलर यांच्या Confessions of a Thug या पुस्तकाचें रा. बा. अनंदराव सखाराम बर्वे यांणीं केलेलें भाषांतर. किंमत २॥ रुपये.

**सौभाग्यरत्नमाला**—भाग पहिला—स्त्रियांनीं वांचण्यास योग्य आणि त्यांस बोध होईल अशा गोष्टी रा. रा. रामचंद्र भिकाजी गुंजीकर यांणीं लिहिल्या—किं. ६ आणे.

**दोन गोष्टी**—कै. बजाबा रामचंद्र प्रधानकृत "फारां दिसांची गोष्ट" आणि "झालें तें ठीक झालें." आरंभीं बजाबा यांचें चरित्र छापलें आहे. कीं० ४ आणे.

**अभिनवकादंबरी**—बाणकविकृत कादंबरीचें रा. गंगाधर रामचंद्र मोगरे यांणीं आर्यावृत्तामध्यें काढलेलें सुंदर सार—किं० ९ आणे.

**वनस्पतिशास्त्राचीं मूलतत्त्वें**—डा० भालचंद्र कृष्ण भाटवडेकरकृत—किं० १। रुपया.

**गृहिणीकंठभूषण**—स्त्रियांना अत्यंत उपयुक्त असे डा० सखाराम अर्जुन यांणीं लिहिलेले निबंध—१ रजस्वला स्त्रियांविषयीं, २ गर्भिणी स्त्रियांविषयीं, ३ प्रसूतीविषयीं, ४ सूतिकावस्थेविषयीं, ५ बालसंगोपनाविषयीं. यांत आर्यवैद्यकांतील माहिती ठिकठिकाणीं घातली आहे व पुस्तकाच्या आरंभीं डा. सखाराम यांचें चरित्र जोडलें आहे. किं. १२ आणे.

**व्हिक्टोरिआमहाराणीचें चरित्र**—भाग पहिला—हिंदु युनियनक्लबच्या एका सभासदानें लिहिलें. किं. २ आणे.

**सौभाग्यरत्नमाला**—दोन्ही भाग एकत्र—किं. ११ आणे.

**सुंदरेची संक्रांत**—रा. रा. गणेश जनार्दन आगाशे बी. ए. यांणीं लिहिली. स्त्रियांस अत्यंत बोधप्रद आणि मनोरंजक. किं. १॥ आणा.

**अबलासंजीवन**—डा० भालचंद्र कृष्ण भाटवडेकर यांणीं स्त्रियांच्या उपयोगासाठीं मुद्दाम लिहिलें. किं. १ रुपया.

**GANPATI ATHARVA SHIRSHA**

*( Translated from Sanskrit into English. )*

BY

K. RAGHUNATHJI, M.R.A.S.

AUTHOR OF

"The Ajapa-Gáyatri Mantra;" "Sucharitra;" "Vairágí;" "The Observance of Truth;" "The Indian Revolt;" "The Burials of Different Nations;" "Food, how Cooked and Eaten." &c., &c., &c.

Price including postage 2½ annas.